# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २८, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६४**

---

### हेदुटणे (ता.पनवेल, जि.रायगड) गावाला निवासी क्षेत्राचा दर्जा देण्याबाबत

**(१) * ९८९३२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेदुटणे (ता.पनवेल, जि.रायगड) गावाला नयना प्राधिकरणाचा प्रस्तावित भूवापर क्षेत्र नकाशा अंतिम होण्यापूर्वी मुळ गावठाण व गावासभोवतालच्या २०० मीटर त्रिज्येच्या परिसरातील क्षेत्रास प्रस्तावित किमान विकास वापर (Low Development Zone) क्षेत्रातून वगळून त्याचा समावेश निवासी क्षेत्र (Residential Zone) म्हणून करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्रधान सचिव, नगरविकास यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नयना क्षेत्रातील इतर गावांच्या गावठाणांना निवासी क्षेत्राचा दर्जा दिला असून त्यानुषंगाने सुविधाही दिलेल्या असताना हेदुटणे गावठाणास निवासी क्षेत्राचा दर्जा देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावास प्रस्तावित किमान विकास क्षेत्रातून वगळल्यास गावातील विकास कामांवर भविष्यात बंधन येणार नाहीत तसेच नयना क्षेत्रातील इतर गावांच्या गावठाणांप्रमाणेच हेदुटणे गावास सुविधा प्राप्त होतील, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून हेदुटणे गावास निवासी क्षेत्राचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.१/५/२०१७ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले असुन त्यामध्ये त्यांनी मौ.हेदुटणे या गावाचे मुळ गावठाण क्षेत्र प्रारुप विकास योजना नैना (२०१ गांव) अंतिम करताना गावठाण क्षेत्र म्हणून कायम करण्याची विनंती केली आहे.
(२), (३) व (४) हेदुटणे गावठाण हे महसुली गावठाण असले तरी महसुली अभिलेखानुसार लोकवस्ती नसलेले क्षेत्र असल्याने सिडकोने प्रारुप विकास योजनेत लोकवस्ती नसलेले क्षेत्र असे दर्शविले आहे. प्रारुप विकास योजना सिडकोने शासनास दि.२२/९/२०१७ रोजी मंजूरीकरिता सादर केली असुन, सदर प्रारुप विकास योजनेवर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. प्रारुप विकास योजना मंजुर करताना मा.लोकप्रतिनिधी यांचे निवेदनावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेत विकास हक्क हस्तांतरण (टी.डी.आर.) देण्याच्या प्रकरणात झालेला गैरव्यवहार

**(२) * १०१५८६ श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेत सन २००८ ते २०१७ या कालावधीत विकास हक्क हस्तांतरण (टी.डी.आर.) देण्याच्या प्रकरणात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील पडेगांव, मिटमिटा, भावसिंगपुरा या भागामध्ये १५०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राचे सुमारे ७० विकास हक्क हस्तांतरण देय केलेल्या प्रकरणात अनियमितता झाली असून, अपूर्ण कागदपत्रे व मालकी हक्क जागेची मोजणी याबाबत तपासणी न करता प्रस्तावांना मान्यता दिलेली असताना आयुक्त, महानगरपालिका अथवा शासनाने कोणतीही चौकशी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकास हक्क हस्तांतरण गैरव्यवहारातील काही अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले परंतु इतर दोषी कनिष्ठ अभियंते व उप अभियंते यांची चौकशी न करता महानगरपालिकेने त्यांना संरक्षण दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उर्वरित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच गैरमार्गाने दिलेले विकास हक्क हस्तांतरण परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. मात्र, ज्या प्रकरणात विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे, त्यातील एकही प्रकरण पडेगाव, मिटमिटा, भावसिंगपुरा या भागातील नाही.
(३) व (४) नाही. याप्रकरणी तत्कालीन सहायक संचालक, नगररचना, तत्कालीन दोन उप अभियंता, नगर रचना व तत्कालीन दोन कनिष्ठ अभियंता यांची विभागीय चौकशी सुरू असून चौकशी अंती उचित निर्णय घेण्यात येईल.
(५) लागू नाही.

-----------------

## मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील पोलिसांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(३) * १०२८७८ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं.१६अ/१/१अ/२/२पै,१६इ, ४०६, १६अ/१/१अ/१ पै तसेच मौजे समेळ सर्व्हे क्रं.४९, हिस्सा क्रं.८/४ या पोलिसांसाठी आरक्षित असलेल्या पोलिसांच्या जागेवर जितेंद्र गोविंद पुजारी, सचिन वझे, निलेश ठाकूर, दिलीप आंबावकर इत्यादी व्यक्तींनी बनावट दस्ताऐवजाच्या आधारे बनावट सी.सी. निर्माण करुन अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक रहिवाशी श्री.गोविंद गुंजाळकर यांनी लेखी पत्राव्दारे निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विकासकांवर बनावट दस्ताऐवजाच्या आधारे अनधिकृत बांधकाम व एमआरटीपी ॲक्ट १९६६ अन्वये महानगरपालिकेकडून अत्यंत गंभीर प्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करणे आवश्यक असताना देखील अद्यापी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणात दोषी असलेल्या व्यक्तींवर व विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) श्री.गोविंद गुंजाळकर यांचे या संदर्भातील सप्टेंबर महिन्यातील पत्र आढळून येत नसल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) सर्वे क्र. १६अ/१/१अ/ २/२पै चे क्षेत्र २१७८० चौ.फुट इतके आहे व या क्षेत्रावर तळमजला+३ माळ्याच्या चार इमारती सन १९८७ पासून अस्तित्वात आहेत. याप्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदी अन्वये संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत. सर्वे क्र.४०६ चे क्षेत्र सुमारे १४००० चौ.फुट असून या क्षेत्रावर विरार पोलिस ठाण्याची इमारत अस्तित्वात आहे.

सर्वे क्र. १६अ/१/१अ/१पै चे क्षेत्र सुमारे १४००० चौ.फुट असुन या क्षेत्रावर पोलिस कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थाने अस्तित्वात आहेत. सर्वे क्र. ४९, हिस्सा क्र. ८/४, चे क्षेत्र सुमारे ३६०० चौ.फुट असुन या क्षेत्रावर तळ मजला + ३ ची

अनधिकृत इमारत अस्तित्वात आहे. सदर इमारतीस वसई-विरार शहर महानगरपालिकेने बांधकाम परवानगी किंवा भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. परंतु, विकासकाने बनावट कागदपत्रे वापरुन दुय्यम निबंधकाकडे दस्त नोंदणी केल्याचे आढळून आल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदी अंतर्गत भोगवटदारा विरुध्द दिनांक २६.०८.२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी बनावट कागदपत्रे तयार करुन दस्त नोंदणी केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित विकासकाविरुध्द भा.दं.वि. अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मालाड-पूर्व (मुंबई) येथील विशेष अल्पवयीन गतिमंद मुलीचे तिस-यांदा अपहरण झाल्याबाबत

**(४) * ९७५१० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड-पूर्व (मुंबई) येथे राहणाऱ्या दहा महिन्यांपूर्वी सामूहिक बलात्कार झालेल्या विशेष अल्पवयीन गतिमंद मुलीचे तिस-यांदा अपहरण झाल्याने या घटनेसंदर्भात दिंडोशी पोलीस ठाण्यात दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणात राष्ट्रीय भ्रष्टाचार आणि अपराध निवारक परिषदेच्या अध्यक्षांनी सदरहू पीडित मुलीला आणि तिच्या कुटुंबीयांना संरक्षण देण्याची मागणी मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, पोलीस आयुक्त यांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार आरोपीस अटक करुन कारवाई करणे आणि पीडित मुलगी व तिच्या कुटुंबियास तातडीने संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटनेबाबत दि. ०२ ऑक्टोबर, २०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) नमूद गुन्ह्यामध्ये फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तीन घटनासंदर्भात दिंडोशी पोलीस ठाणे अंतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(अ) दि. २१.१०.२०१६ रोजीच्या घटनेसंदर्भात गु.र.क्र. ८०८/२०१६, कलम ३६३, ३७६, ३७६(ड) भा.द.वि. सह ३, ४ लहान मुलांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(ब) दि. १५.०७.२०१७ रोजीच्या घटनेसंदर्भात गु.र.क्र. ५३४/२०१७ कलम ३६३, ३७६, ३४ भा.द.वि. सह ३, ४ लहान मुलांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन दोन आरोपींविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(क) दि. २८.०९.२०१७ रोजीच्या घटनेसंदर्भात गु.र.क्र. ६५७/२०१७ अन्वये कलम ३६३, ३४२, ३७६, ३४ भा.द.वि. सह कलम ३, ४ लहान मुलांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यात तीन आरोपींना अटक केली असुन ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. सद्यस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.

पिडीतेस व तिच्या कुटूंबियांना आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण पुरविण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहर व परिसरात मागील दहा महिन्यात झालेल्या ८० खूनांबाबत

**(५) * ९६६४४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात निरीजवळ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास सकाळी ४ ते ५ च्या दरम्यान चंद्रपूरच्या प्राचार्यांची हत्या करण्यात आल्याचे, तसेच यापूर्वी तीन दिवसात तीन खून झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीमध्ये नागपूर शहर व परिसरात जवळपास ८० खून झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात अतिमहत्वाच्या व्यक्तींचे वास्तव्य असून वारंवार होणाऱ्या हत्यांमुळे येथे कायदा व सुव्यवस्था राहिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त हत्यांप्रकरणी शासनाने चौकशी करून किती आरोपींना अटक केली आहे व याबाबतचा तपशिल काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस स्टेशन बजाज नगर हद्दीत दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी चंद्रपूरच्या प्राचार्य यांची हत्या आणि त्यापुर्वी दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी पोलीस स्टेशन जरीपटका येथे एक खूनाचा गुन्हा आणि पोलीस स्टेशन वाडी येथे एक खूनाचा गुन्हा असे नागपूर शहरात दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी २ खून व दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी १ खून असे ३ खूनाचे गुन्हे दाखल झाले आहेत.

(२) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात माहे जानेवारी ते नोव्हेंबर २०१७ दरम्यान खूनाचे एकूण ८२ गुन्हे दाखल आहेत.

(३) हे खरे नाही.

नागपूर शहरात पोलीस आयुक्तालय अंतर्गत सन २०१६ जानेवारी ते नोव्हेंबर मध्ये घडलेल्या गुन्ह्याच्या तुलनेत सन २०१७ मध्ये खून, खूनाचा प्रयत्न, दरोडे, चेन स्नॅचिंग, दंगे, अपहरण, बलात्कार, इत्यादी गुन्ह्यात मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली आहे.

(४) माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०१७ अखेरपावेतो दाखल ८२ खूनांचे गुन्हयांमध्ये १७० आरोपींना अटक करण्यात आलेली आहे आणि ४४ गुन्ह्यात पुराव्यानिशी मा. न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे. १ गुन्हा अॅबेटेड (आरोपी मरण पावल्याने) फायनल झालेला आहे आणि उर्वरित ३७ गुन्हयांचा तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी-पूर्व (मुंबई) सारीपूर नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(६) * ९५९०३ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी-पूर्व (मुंबई) सारीपूर नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम आकृती विकासामार्फत सन २००५ पासून सुरु असून सदरचे काम वेळेत पूर्ण न झाल्याने झोपडपट्टीधारकांना मागील २ वर्षापासून घरे मिळाली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आकृती विकासकाचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे व हिलक्रिस्ट इमारतीचे काम सुरु असतांना शेजारच्या गणेश चाळ व इतर चाळीला भेगा पडल्या असल्याने तेथील नागरीकांना पर्यायी घरे देण्यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, एम.आय.डी.सी, पोलीस ठाणे, अंधेरी (पूर्व) यांच्याकडे दिनांक २७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्‌वारे मागणी करुनही त्याची दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन विकासकाविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग व मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आदींकडे दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने त्यानुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

तथापि पॉकेट क्रमांक ९ येथे पुनर्वसनाच्या एकूण ७ पैकी ५ इमारतीचे काम पुर्ण झाले असून त्यामधील ५८५ सदनिकांचे वाटप सन २०११ पर्यंत करण्यात आले आहे. पॉकेट क्रमांक ३ व ५ मधील अनुक्रमे १ व ३ पुनर्वसित इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून पॉकेट क्रमांक ९ येथील उर्वरित झोपडपट्टीधारकास या इमारतीमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक ०८/०८/२०१७ व दिनांक २३/०८/२०१७ नुसार पॉकेट क्र. ९ येथील संरक्षक भिंतीचे निरिक्षण करुन त्याची योग्य ती दुरुस्ती तात्काळ करुन पावसाळ्यामध्ये संरक्षण भिंत कोसळून कोणत्याही स्वरुपाची हानी होऊ नये व संरक्षण भिंतीची योग्य ती दुरुस्ती करुन खबरदारी घेण्यास विकासकास सांगितले. दि. १४/०९/२०१७ रोजी घटनास्थळाचे निरीक्षण करण्यात आले असून संरक्षण भिंतीच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून आले आहे. भविष्यात अशा प्रकारची घटना घडणार नाही, याबाबत योग्य त्या उपाययोजना केल्याचे विकासकाने कळविले आहे. दिनांक २०/०९/२०१७ रोजी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी जागेवर प्रत्यक्ष पाहणी केली असता खालील दुरुस्तीची कामे पूर्ण केल्याचे आढळून आले आहे.

- ज्या झोपड्यांच्या भिंतींची पडझड झाली होती त्या दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत.

- १० झोपडयांच्या भिंतींना तडे गेलेले होते, ते बुजवलेले आहेत.
- आवश्यक ठिकाणी भिंतीला प्लास्टर करुन दिलेले आहे.
- आरसीसी संरक्षण भिंतीचे काम पुर्ण केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात विविध शासकीय कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत झालेला गैरव्यवहार

**(७) * १०३२६२ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात विविध शासकीय कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत गैरव्यवहार झाल्याचे व मागील चार वर्षात २३४ अधिकाऱ्यांनी लाच घेतल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये रोजगार हमी योजना विभागातील अधिकाऱ्यांची संख्या सर्वाधिक ४९ असून इंदिरा आवास योजना आणि घरकूल योजनांचे अधिकारी लाच घेत असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) आकडेवारीवरुन स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‍नुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच येथील गैरव्यवहार थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) गत चार वर्षात नाशिक जिल्ह्यातील एकुण २२३ लोकसेवकांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे.

या पैकी ५ प्रकरणातील ६ लोकसेवक हे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, जलयुक्त शिवार, शेततळे, इत्यादी कल्याणकारी योजनेशी संबंधित आहेत. या आरोपी लोकसेवकांवर लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमातील विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असुन, सद्यस्थितीत सदर आरोपी लोकसेवकांवर मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## मौजे नानवीज (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील पोलीस निरिक्षकावर झालेला गोळीबार

**(८) * ९७६१० श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नानवीज (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील पोलीस निरिक्षकावर चार अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची घटना दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अज्ञात हल्लेखोरांचा तपास करुन त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर घटनेबाबत यवत पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६१४/२०१७ भा.दं.वि. कलम ३४१, ३९४, ३९७ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२७) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपी निष्पन्न झाले आहेत. यापैकी २ आरोपींना अटक केली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. एक आरोपी मयत झाला असून एका फरार आरोपीचा शोध सुरु आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या इमारती बांधकामांच्या दिरंगाईबाबत महालेखापालांनी घेतलेले आक्षेप

**(९) * ९५१९० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलाच्या निवासी व अनिवासी ११७ इमारतींपैकी केवळ नऊ इमारतीचे बांधकाम सन २०११ ते २०१६ पर्यंत केल्याप्रकरणी मुंबई पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या इमारती बांधकामांच्या दिरंगाईबाबत महालेखापालांनी आक्षेप घेतल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या इमारतींचे बांधकाम तातडीने पूर्ण होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) पोलीस दलाच्या निवासी व अनिवासी इमारतींच्या बांधकामांसाठी केंद्र शासन पुरस्कृत पोलीस आधुनिकीकरण कार्यक्रम आणि राज्य योजना यांच्या अंतर्गत सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या कालावधीत राज्यात हाती घेण्यात आलेल्या ११७ कामांपैकी ३० कामे पूर्ण, ३२ कामे प्रगतीपथावर आहेत, २० कामे नियोजन स्तरावर आहेत. उरलेली ३५ कामे इतर कारणांमुळे सुरु होऊ शकली नाही.

-----------------

## परभणी महानगरपालिकेची विद्युत बिले ऑनलाईन आरटीजीएसव्दारे भरताना केलेला गैरव्यवहार

**(१०) * १०२१२९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेच्या विद्युत बिलांबरोबर खाजगी व्यक्तींची बिले ऑनलाईन आर.टी.जी.एस.व्दारे अदा करुन रुपये ७१ लाखांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार महानगरपालिकेच्या निधीतून खाजगी व्यक्तींची बिल अदा करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सदर प्रकरणी कोतवाली पो.स्टे., जि.परभणी येथील गु.र.न.३६१/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४६९, ४७०, ४७१, ४७७ (ब), ३४ अन्वये दि.२७/०९/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील २ आरोपींनी माहे जानेवारी २०१५ ते ऑगस्ट २०१७ या कालावधीत महानगरपालिकेकडून महावितरण कंपनीस भरण्यात येणारे मिटरबिलाचे मुळ यादीत फेरबदल करुन, महावितरण कंपनी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची बिल भरण्यावर सुट नसतानांही तसेच खाजगी ग्राहकांचे बिल भरण्याचा अधिकार नसतानांही स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी एकूण ७६४ खाजगी ग्राहकांना ५ ते १० टक्के या प्रमाणात सुट दिली व सदर ग्राहकाचे बिल हे महानगरपालिकेच्या लाईट बिलाच्या आर.टी.जी.एस. मधून अदा करुन नमूद दोन्ही आरोपींनी महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

गुन्ह्यातील आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध घेण्यावर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई मेट्रो-३ च्या कामांमुळे इमारतींना निर्माण झालेला धोका

**(११) * ९८३८५ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो-३ च्या कामासाठी रात्रीच्या वेळेस अवजड वाहने व मशीनची वाहतूक करु देण्याची मुंबई मेट्रो महामंडळाची (एमएमआरसीएल) विनंती मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास फेटाळली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई मेट्रो-३ च्या कामामुळे कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गावरील इमारती व बांधकामांना हादरे बसत असून सदरहू इमारती व बांधकामांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई मेट्रो-३ च्या रात्री चालणाऱ्या ग्रीलिंगच्या कामामुळे जमिनीला हादरे बसत असल्याने परिसरातील इमारती व बांधकामे कोसळून जीवित व वित्त हानी होवू नये याकरिता मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई मेट्रो - ३ प्रकल्पामधील कफ परेड येथील मेट्रो स्टेशनच्या बांधकामाकरिता उत्खनन व वाहतूक याकामासाठी रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या वेळेत मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२१०७/२०१७ मध्ये दि.११.८.२०१७ रोजीच्या अंतरीम आदेशान्वये पुढील सुनावणीपर्यंत बंदी घातली आहे. तसेच दि. ३०.११.२०१७ रोजीच्या आदेशान्वये रात्री १०.०० ते १२.०० या कालावधीमध्ये उत्खननातून निघालेल्या साहित्याची कफ परेड येथून वाहतूक करण्यास ३ दिवसासाठी प्रायोगिक तत्वावर अनुमती दिली आहे.

तद्नंतर दि.०४.१२.२०१७ रोजीच्या सुनावणीत याबाबतीत सुयोग्य तोडगा सुचविण्यासाठी याचिका क्र.३६५/२०१७ मध्ये गठित केलेल्या दोन न्यायाधिशांच्या समितीकडे सदरचा विषय पाठविला आहे.

(२) नाही.

(३) व (४) मुंबई मेट्रो ३ साठी नियुक्त केलेल्या सर्वसाधारण सल्लागारानी मेट्रो मार्गिकेच्या प्रभाव क्षेत्रातील सर्व इमारतीचे सर्वेक्षण केले आहे. मुंबई मेट्रो ३ च्या कामामुळे सदर इमारतींना कोणताही धोका निर्माण होणार नाही यांची पुरेपूर काळजी घेण्यात येत आहे.

-----------------

## सावली (जि.चंद्रपूर) येथील नगरोत्थान योजनेंतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावाबाबत

**(१२) * ९५१६८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) येथील नगरोत्थान योजनेंतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करून निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी संचालक नगरप्रशासन नगरविकास विभाग वरळी, मुंबई यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सतत पाठपुरवठा केला असतानाही अद्यापही मंजूरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्पास सक्षम तांत्रिक प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेऊन प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे.

• त्यानुसार सावली शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेऊन सदर प्रस्ताव नोव्हेंबर, २०१७ मध्ये सदर योजनेची नोडल यंत्रणा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे सादर केला आहे.

(२) • सावली नगरपंचायतीच्या सदर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी होत्या.

• सदर प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करणेबाबत सावली नगरपंचायतीस नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत कळविण्यात आले होते.

• सदर त्रुटींची पूर्तता सावली नगरपंचायतीकडून डिसेंबर २०१७ मध्ये करण्यात आली आहे.

(३) व (४) सावली नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून करण्यात येत आहे.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आलेल्या विकासात्मक कामांची तपासणी करण्याबाबत

**(१३) * १०२१६९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सन २०१४-१५ ते आजतागायत करण्यात आलेल्या व येत असलेल्या पूर्ण व अपूर्ण विकासात्मक कामांची गुण नियंत्रण पथकामार्फत तपासणी करुन विशेष तपास पथकामार्फत चौकशी व संबधितांवर कारवाई करावी याबाबतचे लेखी निवेदन कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना तसेच नगरविकास विभागास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि. ०७.०४.२०१७ चे पत्र प्राधिकरणास प्राप्त झाले हे खरे आहे. या निवेदनास दि.०२.०८.२०१७ रोजी कार्यकारी अभियंता यांनी उत्तर दिले आहे.

(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भिवंडी तालुक्यातील कामांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली असून सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांमार्फत कामांची दैनंदिन देखरेख, गुणवत्ता नियंत्रण इत्यादी करण्यात आले आहे.

-----------------

## नाशिक शहरातील कॉलेजरोड परिसरात बनावट कंपनी स्थापन करुन सुशिक्षित बेरोजगारांची केलेली फसवणूक

**(१४) * ९६२६४ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील कॉलेजरोड परिसरात बनावट कंपनी स्थापन करुन केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाच्या नावाखाली एकूण दोनशे सुशिक्षित बेरोजगारांची आर्थिक फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपी झारखंड राज्यातील असून त्याने स्पर्श पब्लिक हेल्थ हेल्पलाईन या नावाने कंपनी स्थापन करुन केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाशी झालेल्या बनावट कराराव्दारे सुशिक्षित बेरोजगार तरुणांची आर्थिक फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून झारखंड राज्यातील इसम दिलीप गुप्ता याने बनावट कंपनी स्थापन करून सदर कंपनीस भारत सरकारच्या स्वास्थ एवं परिवार कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे कॉन्ट्रॅक्ट मिळाल्याचे बनावट पत्र दाखवून फिर्यादी व इतर २०० पेक्षा जास्त लोकांकडून नोकरीचे आमिष दाखवून प्रत्येकी १०००/- रू.ॲग्रीमेंट फी घेवून फसवणूक करून सदर रकमेचा अपहार केला आहे.

सदर प्रकरणी गंगापूर पो.स्टे. नाशिक शहर येथे गु.र.नं. २९७/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४७१, ४०६ नुसार दि.०२/१०/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## अजंग-दाभाडी (ता.मालेगाव, जि.नाशिक) रस्त्यावरील अपघातात सात शेतमजूर महिलांचा झालेला मृत्यू

**(१५) * १०३५१२ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजंग-दाभाडी रस्त्यावरील ढवळी विहीर तलावात ट्रॅक्टर ट्रॉली उलटून झालेल्या अपघातात वडेल (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील सात शेतमजूर महिलांचा दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना व जखमी मजूरांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक २४.१०.२०१७ रोजी १७.३० चे सुमारास २२ शेतमजूर स्त्रियांना ट्रॅक्टर व ट्रॉलीमध्ये बसवून घेऊन जाणारा ट्रॅक्टर अजंग शिवारात नाल्याचे बंधाऱ्यात पलटी झाल्याने ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये बसलेल्या ७ शेतमजूर स्त्रियांचा मृत्यु झाला तर ट्रॅक्टरचालक व इतर १५ शेतमजूर स्त्रिया जखमी झाल्या.

याप्रकरणी वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणे येथे दिनांक २५.१०.२०१७ रोजी गु.र.क्र. ८४/२०१७, भा.दं.वि. ३०४-अ, २७९, ३३७, ४२८, मो.वा.का. १८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यातील आरोपी ट्रॅक्टरचालक यास दिनांक ३०.१०.२०१७ रोजी अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यास दिनांक १०.११.२०१७ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर केली होती. आरोपी मा.न्यायालयाच्या आदेशाने सध्या जामीनावर आहे.

अपघात मयत झालेल्या ७ स्त्रियांपैकी दारिद्रयरेषेखाली असलेल्या ५ स्त्रीयांच्या कुटुंबियांना राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्रत्येकी रु.२०,०००/- चे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. मयत ७ स्त्रियांपैकी नावावर ७/१२ उतारा असलेल्या एका स्त्रीच्या कुटुंबास मा.गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत मदत मिळण्याकरीता आवश्यक मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. दुर्घटनाग्रस्तांना मुख्यमंत्री सहायता निधीतून सहाय्य मिळणेकरीता प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे

अपघातातील जखमी १५ स्त्रियांचे वैद्यकीय बिल शासनामार्फत अदा करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पोलीस कर्मचारी निवासस्थानांच्या दुरवस्थेबाबत

**(१६) * ९८१७२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग, म्हसळा, मुरूड, पेणसह इतर तालुक्यातील पोलीस कर्मचारी निवासस्थांनाची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरवस्था झालेल्या पोलीस कर्मचारी निवासस्थांनामध्ये कर्मचारी व त्यांचे कुटुंब भितीच्या वातावरणात राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवासस्थांनाजवळ घाणीचे साम्राज्य असून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पोलिस कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज अशी नवीन इमारत अथवा निवासस्थानांची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) अलिबाग येथील पोलीस शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती करण्यासाठी रु.१२०.८३ लक्ष इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.८१.६२ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. पोलीस ठाणे, पेण, येथील निवासी इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु.४६.७५ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. उक्त निवासस्थानांच्या दुरुस्तीबाबत क्षेत्रीय स्तरावरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे. तसेच, पोलीस ठाणे, मुरूड व पोलीस ठाणे, रोहा येथील निवासी इमारतींची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, यांचेकडून करुन घेण्यात आली आहे. रेवदंडा येथील निवासस्थानांच्या दुरुस्तीबाबत क्षेत्रीय स्तरावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे म्हसाळा कर्जत येथील पोलीस निवासस्थान व उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालय व निवासस्थान इमारत बांधकामाबाबतचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून सादर केला आहे व हे काम नियोजन स्त्रावर आहे.

अलिबाग, जिल्हा रायगड, येथे ३८४ पोलीस शासकीय निवासस्थाने व प्रशासकीय इमारतीचा प्रकल्प महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने हाती घेतला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील इमेज या जाहिरात कंपनीला बेकायदेशीरपणे ठेका दिल्याबाबत

**(१७) * ९५७५२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील इमेज या जाहिरात कंपनीला बेकायदेशीरपणे ठेका देवून नगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार इमेज जाहिरात कंपनीला दिलेला ठेका रद्द करून नगरपालिकेतील सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) उक्त प्रकरणी ई-निविदा प्रक्रियेद्वारे विहित पध्दतीनुसार इमेज या जाहिरात कंपनीला कुळगाव-बदलापुर नगरपालिका क्षेत्रातील नगरपालिका मालकीच्या जागेवरील होर्डींग जाहिरात प्रसारणाचे अधिकार देण्यात आले आहेत.

तथापि, निविदेतील काही अटींचे पालन न केल्यामुळे त्यांचेवर कायदेशीर कारवाई का करण्यात येऊ नये ? याबाबत कुळगाव-बदलापुर नगरपरिषदेने निविदाकारांना दिनांक ०४.१२.२०१७ रोजी नोटीस दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यात अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी बांधलेल्या म्हाडाच्या सदनिका विक्रीविना पडून असल्याबाबत

**(१८) * १००९७१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी बांधलेल्या म्हाडाच्या सदनिकांचे मूल्य बाजारभावापेक्षा अधिक असल्याने उक्त सदनिका विक्रीविना पडून असल्याचे माहितीच्या अधिकाराअंतर्गत केलेल्या अर्जाद्वारे माहे नोव्हेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, देवळाई येथे ४०४ सदनिकांसाठी पाणी पुरवठा नसल्याने सदनिकांची विक्री होत नसल्याचे म्हाडाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या किंमती अधिक असल्याने व आर्थिक मंदीमुळे सदनिकांचे उतरलेले दर यामुळे मागील ४ वर्षात सदनिका विक्री न झाल्याने गुंतवणूक केलेली रुपये ११५ कोटीहून अधिक रक्कम वसूल करण्याबाबतची समस्या म्हाडासमोर निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) सदर सदनिकांची किंमत म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार परिगणीत करण्यात आलेली आहे. बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे सध्या सदनिकांना मागणी नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(२) देवळाई येथील योजनेसाठी एम.आय.डी.सी. औरंगाबाद यांचेकडून नळ जोडणी मंजूर करण्यात आलेली असून पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी पाठपुरावा चालु आहे. तसेच देवळाई हा परिसर महानगरपालिका, औरंगाबाद क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यांचेकडूनही पाणी पुरवठा उपलब्ध करण्यासाठी औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे प्रयत्न करण्यात येत आहे.
(३) ते (५) पोलिस विभागाने मागणी केलेल्या २५६ सदनिकांची वाटप प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. २५६ सदनिकांकरीता रु.४३.१४ कोटी रक्कम पोलीस विभागाकडून मिळणार आहे. अशा प्रक्रारे मंडळाचा अडकलेला निधी प्राप्त करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई शहर व परीसरात बलात्कार, अपहरण व विनयभंग इत्यादी गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ

**(१९) * ९६३२१ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार**

**(ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक १ जानेवारी ते १ ऑगस्ट, २०१७ या कालावधीत बलात्काराचे ४०७ गुन्हे, महिला व अल्पवयीन मुली यांच्या अपहरणाचे एकूण ६६१ गुन्हे तसेच छेडछाड व विनयभंगाचे १ हजार २५७ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील विक्रोळी व कुर्ला येथे शालेय विद्यार्थी तसेच महिलांची छेडछाडी व विनयभंग करुन एका शालेय विद्यार्थ्यीनीला भररस्त्यात मारहाण केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई सीएसटी ते करी रोड या दरम्यान लोकलमध्ये दिनांक २२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास महिलांच्या डब्यात शिरलेल्या एका व्यक्तीच्या हातून सुटका करण्यासाठी अल्पवयीन मुलीने गाडीतून उडी मारली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, विरार-बोरिवली दरम्यान महिला उतारुंवर होणाऱ्या हल्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ झाली असुन दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत विरार ते बोरिवली प्रवासादरम्यान लोकलमध्ये महिलांच्या डब्यात शिरुन महिलांना मारहाण, चोरीचे व खूनाचे असे एकूण किती प्रकार घडले आहेत,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने आढावा घेऊन महिला व अल्पवयीन मुलीं संदर्भातील गुन्हे रोखण्याबाबत व त्यांना संरक्षण मिळावे याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रांतर्गत दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ जुलै, २०१७ या कालावधीतील महिला व अल्पवयीन मुली यांच्यावरील बलात्कार, अपहरण, छेडछाड व विनयभंग याबाबत नोंद गुन्हयांची माहिती खालीलप्रमाणे :-

| बलात्कार | | अपहरण | | छेडछाड | | विनयभंग | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दाखल | उघड | दाखल | उघड | दाखल | उघड | दाखल | उघड |
| ४०७ | ३४९ | ७८५ | ५७४ | २५६ | १३८ | १२५७ | ९५४ |

(२) विक्रोळी पोलीस ठाणे किंवा पार्कसाईट पोलीस ठाणे येथे अशा प्रकारचा गुन्हा घडल्याची कोणतीही नोंद नाही.

तथापि, विद्यार्थीनीचा विनयभंग करून मारहाण केल्याबाबत नेहरूनगर पोलीस ठाणेअंतर्गत गु.नों.क्र.२७१/२०१७ कलम ३२६, ३२४, ३५४ (अ), (ड), ५०९,५०४,५०६ भा.द.वि. सह कलम ८, १२ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विरार बोरीवली दरम्यान दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ ऑक्टोंबर, २०१७ या कालावधीत महिलांच्या डब्यात शिरून महिलांना मारण्याचे, चोरीचे व खुनाचे प्रकार याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | दाखल | उघड | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| मारण्याचे प्रकार | ४ | १ | १ |
| चोरीचे प्रकार | ११० | १० | १० |
| खुन | ० | ० | ० |

(५) महिला व अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराचे गुन्हे रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• पोलीस दीदी योजना व विशेष पथके राबविण्यात येतात.

• शालेय विद्यार्थांना बॅड टच व गुड टच बाबत सामाजिक संस्था व एनजीओ यांच्यामार्फत मार्गदर्शन.

• मोहल्ला कमिटी तसेच पोलीस मित्र यांच्यामार्फत अनोळखी व्यक्तींपासून खबरदारी घेण्याबाबत मार्गदर्शन.

• प्रत्येक पोलीस ठाणे हद्यीत बिनतारी संदेश वाहन, बीट अधिकारी व अंमलदार यांच्यामार्फत गस्त घालण्यात येते.

• महिला तक्रार अर्ज व महिला अत्याचार विषयक दाखल गुन्हयांचा तपास व चौकशी करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला कक्षाची स्थापना तसेच महिलांशी चर्चा करून महिला दक्षता समितीची स्थापना.

• महिला छेडछाड पथके तयार करण्यात आली असून पथकांमधील पोलीस अधिकारी अंमलदारांची नावे भ्रमणध्वनी पोस्टरद्वारे त्या त्या पोलीस ठाणेंच्या हद्दीत प्रसारीत केले आहेत.

• बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत ९४ महिला व बाल सुरक्षा गस्त पथके तयार करण्यात आली आहेत.

• १०२ महिला बीट मार्शल (चार्ली मार्शल) मोटर सायकल वाहनांसह नेमण्यात आली आहेत.

• विशेष हेल्पलाईन १०३ सुरु करण्यात आली तसेच प्रतिसाद ॲप्स सुरू करण्यात आले आहे.

• निर्मनुष्य जागांचे सुरक्षा ऑडीट करण्यात आले असून अशा ठिकाणी सिसिटिव्ही कॅमेरा, प्रकाश व्यवस्था इ. सारख्या उपाययोजना करण्यात येतात.

• महत्वाच्या रेल्वे स्थानकांवरील नियंत्रित टॅक्सी स्टॅण्डवर पोलीस पथके नेमण्यात आली आहेत.

• जनजागृतीसाठी पोलीसांमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती वर्तमानपत्रे, टिव्ही माध्यमे व इतर समाजमाध्यमांद्वारे प्रसारीत करण्यात येतात.

• अल्पवयीन मुलींच्या संदर्भातील घटनांना प्रतिबंध करण्यासाठी पॉक्सो कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येते.

• दिनांक १२.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यतील प्रत्येक जिल्हयात महिला अत्याचार प्रतिबंध विशेष पथके स्थापन करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सुरक्षा बल महामंडळाच्या सुरक्षा जवानांच्या विविध मागण्यांबाबत

**(२०) * ९५००४ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुरक्षा बल महामंडळाच्या सुरक्षा जवानांची सुरक्षा सध्या मुंबई मेट्रोसह, विमानतळ, शासकीय रुग्णालये आणि इतर महत्वाच्या देवस्थानाबाहेर तैनात करण्यात आली असतांना कोणतीही पूर्वसूचना न देता सदरहू सुरक्षा रक्षकांनी वेतन वाढीसह कायमस्वरुपी नोकरीची हमी व इतर मागण्यांसाठी दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी पासून अचानक संप पुकारल्याने अत्यावश्यक सेवांच्या सुरक्षेवर विपरीत परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचानक संपावर गेलेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या सुमारे ४५० जवानांना महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाने बडतर्फ केल्याची बाब दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सुरक्षा बलाची स्थापना दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबई हल्ल्यांनतर रामप्रधान समितीच्या शिफारशींनुसार करण्यात आली असून यापुर्वीही सदर सुरक्षा बलातील कंत्राटी तत्वावर कार्यरत जवानांनी त्यांना कायमस्वरुपी सामावून घेणे व मानधन वाढवून मिळण्याबाबत दिनांक १८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास आंदोलने केलेली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना कंपनीकडून अन्यायकारक वागणूक, व मानसिक त्रास दिला जात असून सदर जवानांना रुपये १२ हजार एवढा तुटपुंजी पगार दिला जात असून त्यांच्यावर जाचक नियम लादून कसुरीबाद्दल वेतनातून ५०० ते १००० रुपये कापले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानांच्या मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या दिनांक १९ सप्टेंबर,२०१७ रोजी पासून अचानक संप पुकारला होता हे खरे आहे तथापि त्यामुळे अत्यावश्यक सेवेवर विपरीत परिणाम झाला हे खरे नाही.

(२) संपात प्रत्यक्ष सहभाग आढळून आलेल्या एकूण १९०४ सुरक्षा रक्षकांचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे.

(३) सन २००८ मध्ये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यात आली. तथापि उक्त महामंडळाच्या सुरक्षा रक्षकांनी दिनांक १८/०५/२०१७ रोजी वा त्या सुमारास कोणतेही आंदोलन केलेली नाही.

(४) महामंडळातील सुरक्षा रक्षकांना प्रतिमहा रु.१४,००० /- एवढी रक्कम करारानुसार दिली जाते. तसेच सुरक्षा रक्षकांने कर्तव्यात कसुर केल्यास त्याबाबत महामंडळाच्या नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येते.

(५) सुरक्षा रक्षकांना मासिक मोबदला व्यतिरिक्त भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना, अर्जित रजा, उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदान, रु.३ लाखाचा मेडीक्लेम, सुरक्षारक्षकांचे आकस्मिक निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना रु.१५ लाख एवढ्या रकमेचा विम्याचा लाभ दिला जातो.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील सुरक्षा रक्षकांची मुख्य मागणी त्यांना पोलीस दलातील कर्मचा-याप्रमाणेच वेतन व सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशी आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील सुरक्षा रक्षक यांना कंत्राटी पध्दतीने नेमले असल्याने त्यांना पोलीस दलातील कर्मचा-यानुसार वेतन व सोयी सुविधा उपलब्ध नाहीत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयात यवतमाळ, वणी, पांढरकवडा (जि.यवतमाळ) या तालुक्यामधून दारुचा पुरवठा होत असल्याबाबत

**(२१) * १०३२८९ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हात दारु बंदी झाल्यानंतरही यवतमाळ, वणी, पांढरकवडा (जि.यवतमाळ) या तालुक्यांमधून मोठ्या प्रमाणात दारुचा पुरवठा केला जात असल्याचे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध दारूसंदर्भातील कारवाई करताना केवळ दारूची वाहतुक करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात येते मात्र उक्त दारु कुणाकडून व कुठून आणली जात आहे याचा तपास पोलीसांकडून केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त प्रकरणी दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच अशा स्वरुपातील प्रकरणांचा संपूर्ण तपास करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून, सन २०१७ मध्ये नोव्हेंबर, २०१७ अखेर यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, पांढरकवडा आणि वणी तालुक्यात अवैध दारु वाहतूक संदर्भात एकूण २३२ गुन्ह्यात २८३ आरोपींविरूध्द गुन्हे नोंदवून रु.२.३९ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस विभागाकडून, सन २०१७ मध्ये नोव्हेंबर, २०१७ अखेर चंद्रपूर जिल्ह्यात अवैध दारु वाहतूक प्रकरणी ६९ गुन्हे दाखल करण्यात आले असून ११३ आरोपींना रु.३.९१ कोटी किंमतीच्या मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे.

याप्रकरणी तपासात निष्पन्न झाल्यानुसार यवतमाळ जिल्ह्यातून चंद्रपूर जिल्ह्यात अवैध देशी, विदेशी मद्याचा पुरवठा प्रकरणी १७ अनुज्ञप्तीधारकांपैकी १४ अनुज्ञप्त्या कायमस्वरुपी रद्द व १ अनुज्ञप्ती ३ महिन्यासाठी निलंबित करण्यात आली आहे. तथापि, सदर अनुज्ञप्तीधारक न्यायालयात गेल्यामुळे मा.न्यायालयाच्या आदेशानुसार याप्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदिवली-पूर्व (मुंबई) हनुमाननगर येथील शासकीय भूखंड ३k अंतर्गत विकसित न झाल्याने परत घेण्याबाबत

**(२२) * ९६०६९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली-पूर्व (मुंबई) हनुमाननगर येथील ६ एकरचा शासकीय भूखंड ३k अंतर्गत विकसित करण्यासाठी रुचीप्रिया डेव्हलपर्स यांना सन २००८ मध्ये दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत सदर विकासकाने भूखंडाचा विकास केला नसल्याने शासनाने भूखंड देताना केलेल्या कराराचे विकासकाकडून उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाबरोबर केलेला करार रद्द करुन सदर भूखंड परत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मौजे हनुमान नगर, कांदिवली (पुर्व) येथील न.भू.क्र. १६३ ए व १६६ या मिळकतीवर (४७७६९१.६१ चौ.मी.) समुह झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी शासन पत्र, दि.२६.८.२००९ अन्वये झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३k अन्वये विशेष निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.११.१२.२००९ रोजी मेसर्स रुचीप्रिया डेव्हलपर्स यांना तात्पुरते आशयपत्र दिले आहे.
(२) व (३) सदर योजना अद्याप पुर्ण झालेली नाही.

सदर योजनेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिका व प्राप्त तक्रारी अनुषंगाने सदर योजनेतील अतिक्रमण मुक्त असलेल्या जमिनीवर महसूल व वन विभागाची परवानगी न घेता, विकासकाने बांधकाम केले असल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्या जागेवर विकासकाला परवानगी दिली असल्यास ती रद्द करण्याबाबत व बांधकाम सुरु असल्यास ते थांबविण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.३१.०७.२०१५ रोजी प्राधिकरणास कळविले होते. त्यानुसार प्राधिकरणाने दि.१४.०८.२०१५ रोजी रिकाम्या असलेल्या भूखंडावर सुरु असलेल्या बांधकामास काम थांबविण्याची नोटीस दिली आहे. भूखंडाविषयी कोणताही करार नाही. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडून भूखंड ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. तथापि विकासकाने त्या विरुध्द अप्पर आयुक्त कोकण विभाग यांचेकडे महसूल अधिनियमाअंतर्गत आव्हान दिले होते. त्यानंतर विकासकाने मा.मुंबई उच्च न्यायालयाकडे रिट याचिका (लॉ) क्र. १२५३/२०१७ अन्वये दाद मागीतली आहे. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि. ०४.०५.२०१७ च्या आदेशान्वये सक्तीच्या मार्गाने जागेचा ताबा घण्यास मनाई केली असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील विकासकाकडून खंडणी मागितल्या प्रकरणात इकबाल कासकर व त्याच्या साथीदारांना झालेली अटक

**(२३) * ९७९३० श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील कासारवडवलीत विकासकाकडून चार फ्लॅट व ३० लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी खंडणीविरोधी पथकाने दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास हसीना पारकर हिच्या नागपाडा (मुंबई) येथील घरातून इकबाल कासकर आणि त्याच्या दोन साथीदारांना अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अटक केल्यानंतर इकबाल कासकर याच्या विरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात आणखी दोन खंडणीची गुन्हे दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत छोटा शकील यांचे नावे पुढे आल्यानंतर इकबाल कासकर आणि इतर पाच जणांविरुद्ध संघटित गुन्हेगारी अन्वये कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधित गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) होय, आरोपींनी जिवे मारण्याची धमकी देऊन खंडणीची मागणी केली त्यामुळे फिर्यादीने दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस स्टेशन कासारवडवली येथे गु.र.क्र.१९०/२०१७ भा.द.वि. कलम ३८४, ३८६, ३८७, ३४, १२० (ब) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३ (१) (ii), ३ (२), ३ (४), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित तीन पाहिजे आरोपींसह इतर आरोपीं विरुध्द मा. मकोका न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे दि.२१.११.२०१७ रोजी दोषारोप पत्र दाखल केले आहे व ते स्पेशल कोर्ट नं. २४/२०१७ प्रमाणे न्यायप्रविष्ठ आहे.

पोलीस स्टेशन, कासारवडवली गु.र.क्र. १९०/२०१७ मधील मुख्य आरोपीस अटक झाल्यानंतर पोलीस स्टेशन, ठाणेनगर येथे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस स्टेशन, ठाणेनगर येथे गु.र.क्र.१८४/२०१७ भा.द.वि. कलम ३८४, ३८६, ३८७, ३४ प्रमाणे ३ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित तीन पाहिजे आरोपींसह इतर आरोपीं विरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी,ठाणे न्यायालयात दि.१३.११.२०१७ रोजी दाषारोप पत्र दाखल केले असून कोर्ट केस नं.२८६/२०१७ प्रमाणे न्यायप्रविष्ठ आहे.

पोलीस स्टेशन, ठाणेनगर येथे गु.र.क्र.१९१/२०१७ भा.द.वि. कलम ३८४, ३८६, ३८७, ३४, १२० (ब) गुन्हा नोंद करण्यात आला असून यातील एक आरोपी पोलीस स्टेशन कासारवडवली गु.र.क्र. १९०/२०१७ मधील आरोपी असून त्यास मा. न्यायालयाच्या मंजूरीने ताब्यात घेऊन अटक करुन पुढील तपास करण्याची तजविज ठेवली आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुहू (मुंबई) येथील जेव्हीपीडी स्कीममधील 'प्रार्थना' इमारतीमध्ये गॅससिलिंडरचा झालेला स्फोट

**(२४) * ९७३२८ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू (मुंबई) येथील जेव्हीपीडी स्कीममधील 'प्रार्थना' इमारतीमध्ये एलपीजी गॅससिलिंडरच्या स्फोटामुळे ६ जणांचा मृत्यू व १८ जण जखमी झाल्याची घटना दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना एलपीजी गॅस सिलिंडरच्या बेकायदेशीर वापरामुळे घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदरची घटना दिनांक ०६/०९/२०१७ रोजी घडली असून या दुर्घटनेतील आगीमध्ये आतापर्यंत १० व्यक्ती मयत झाले असून ८ जण गंभीर जखमी तर ६ जण किरकोळ जखमी झाले आहेत.
(२) होय.
(३) विलेपार्ले (पश्चिम), मुंबई या ठिकाणी "प्रार्थना" बिल्डींग ही इमारत उभारण्याचे काम सुरु असून त्याच ठिकाणी पोटमाळ्यावर तसेच तळमजल्यावर तेथे काम करणारे काही कामगार राहत होते. या ठिकाणी अवैधरित्या गॅस सिलींडरचा साठा करुन ठेवण्यात आलेला होता. त्या ठिकाणी गॅस सिलींडरचा स्फोट होऊन दुर्घटना घडली.

या प्रकरणी गु.र.क्र. ५१६/२०१७, कलम ३०४ (अ), ३३७, ३३८, २८५, ३४, भा.दं.वि. सह ३, ७, १० अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ सह कलम १६ गॅस सिलींडर नियम, १९८१ अन्वये दिनांक ०७/०९/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

या प्रकरणी इमारत उभारणीचे काम पाहणाऱ्या कंपनीचे मालक/ भागीदार, अधिकारी, बांधकाम ठेकेदार अशा ७ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या दिलेल्या कंत्राटाबाबत

**(२५) * ९७२६७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेअंतर्गत शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे कंत्राट ४ कोटी रुपयांवरुन १३ कोटी रुपयांवर गेल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम झा.पी.व जय भारत कन्स्ट्रक्शन या कंपनीला ४ कोटी ५६ लाख रुपयांना देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाची निवीदा न काढता कामाला मंजूरी देण्यात आली असल्याने उल्हासनगर महानगरपालिका आयुक्तांनी सदर कंत्राट रद्द केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम साई सिध्दनाथ कंपनीला १३८.५ टक्के अधिक दराने देण्यात आले, हे ही खरे आहे काय.
(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाचे वृत्त वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३), (४) व (५) • उल्हासनगर महानगरपालिकेने प्रभाग क्रमांक १ ते ४ मधील रस्त्यावरील खड्डे भरण्याचा ४.५६ कोटी रकमेचा प्रस्ताव निविदा प्रक्रीयेच्या मंजूरीकरीता स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला होता.

• महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ चे कलम २ (२) अन्वये उल्हासनगर शहरातील रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामाची निविदा शिवाय थेट संविदा करण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करुन दिनांक ०३.०८.२०१७ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेने ठराव पारीत केला.

• उपरोक्त ठराव पारीत करतांना स्थायी समितीने अन्य ३ रस्त्यांवरील खड्डे भरण्याची कामे ठरावात नमूद केली.

• पावसाळा तसेच रस्त्यांची स्थिती पहाता, सदर काम तात्काळ होणे आवश्यक असल्याने स्थायी समितीच्या शिफारस केलेल्या रस्त्यांचा अंतर्भाव करुन सुधारीत ५.६४ कोटींचा प्रस्ताव तयार करुन दिनांक ०८.०९.२०१७ रोजी निविदा मागविण्यात आली.

• सदर निविदेमध्ये सहभागी ३ कंत्राटदाराने अंदाजित रक्कमेपेक्षा १३५ ते १३८ टक्के जास्त दराच्या निविदा भरण्यात आल्या आहे.

• सदर दर अवाजवी असल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली

• तद्नंतर या कामासाठी रु. ५.६४ कोटी या अंदाजित रकमेची फेरनिविदा माहे ऑक्टोबर, २०१७ रोजी मागविण्यात आली.

• सदर निविदा प्रक्रियेमध्ये २ कंत्राटदार सहभागी झाले व यांच्याशी वाटाघाटी करुन दरपत्रकानुसार (At-par) दिनांक १३.११.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

• सदर काम प्रगतीपथावर असून, कोणत्याही कंत्राटदारास कोणतेही देयक अदा करण्यात आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पवयीन मुली मोठ्या प्रमाणात बेपत्ता होत असल्याबाबत

**(२६) * ९५३८५ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३० जून, २०१७ या सहा महिन्यात १८ वर्षाच्या आतील ३००२ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याचे व होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत अल्पवयीन मुलांना, तरुणींना भूलवून पळवणारी टोळी सक्रीय असून या टोळीमार्फत तरुणींना देहव्यापार, आखाती देशातील वेश्या व्यवसाय, घरकाम इत्यादीसाठी वापर केला जात असून सदर टोळीवर कारवाई करण्यास पोलिस यत्रंणा अपयशी ठरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार बेपत्ता मुला-मुलींचा शोध घेण्याबाबत व सदर टोळीवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) राज्यात १ जानेवारी ते ३० जुन २०१७ पर्यंत अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| जाने २०१६ ते जुन २०१६ | जाने २०१७ ते जुन २०१७ |
|---|---|
| २८८१ | २९६५ |

(२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रातांर्गत अल्पवयीन मुलांना, तरुणींना भुलवून पळवणाऱ्या टोळीबाबत कोणताही गुन्हा नोंद नाही.

(३) हरवलेल्या, बेपत्ता मुला-मुलींचा शोध घेणेकामी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• १२ पोलीस घटकांमध्ये विशेष अनैतिक व्यापार प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

• हरवलेल्या बालकांच्या तपासासाठी सुधारीत कार्यप्रणाली तयार करून सर्व घटक प्रमुखांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

• १८ वर्षाखालील हरवलेल्या मुलांच्या कायदेशीर पालकांकडून तक्रार प्राप्त होताच थेट अपहरणाचा गुन्हा दाखल करून तात्काळ कारवाई करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

• जिल्हयाच्या ठिकाणी हरवलेल्या मुला-मुलींच्या तपासाठी स्वतंत्र पथकाद्वारे शोध मोहिम, समाजात प्रबोधनात्मक जनजागृती, हरवलेल्या व्यक्तींची माहिती पोलीस गॅझेटमध्ये प्रसिद्धी करिता पाठविण्यात येते.

• राज्य व जिल्हा पातळीवरील बेपत्ता मुला-मुलींच्या शोधासाठी महत्वाच्या वृत्तपत्रात व दूरदर्शनवर माहिती देण्यात येते.

• केंद्रीय गृह विभाग, नवी दिल्ली यांच्यामार्फत www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आलेली आहेत. तसेच मुंबई पोलीसांची www.mumbaipolice.gov.in व रेल्वे पोलीसांची www.shodh.gov.in ही संकेतस्थळे नियमितपणे अद्यावत केली जातात.

• राज्यात हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी जुलै २०१५ ते जुलै २०१७ या कालावधीत चार ऑपरेशन मुस्कान/ऑपरेशन स्माईल राबविण्यात आलेल्या आहेत. याव्दारे सन २०१६ मध्ये ऑपरेशन स्माईल व मुस्कान अंतर्गत रेकॉर्डवरील हरविलेल्या बालकांपैकी एकूण १६१३ व सन २०१७ मध्ये ६४५ इतक्या बालकांचा शोध लावण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरात ताबूत विसर्जन मिरवणूकीत महानगरपालिकेची बस शिरून झालेला अपघात

**(२७) * १०३४७५ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात पापाची तिकीटी या ठिकाणी दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास ताबूत विसर्जनाच्या मिरवणुकीत कोल्हापूर महानगरपालिकेची वहातुक प्रवासी बस शिरल्यामुळे दोन जण मृत व १९ जण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर अपघातामध्ये दोन व्यक्तींचा जागीच मृत्यु झाला असून, एका व्यक्तीचा उपचार सुरु असताना मृत्यु झाला तसेच १९ व्यक्ती सदर अपघातात जखमी झाल्या आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) सदरची घटना चालकाच्या निष्काळजीपणामुळे घडल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्याने संबंधित चालकास सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्यावर जुना राजवाडा पोलिस स्टेशन, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री आवास योजना व इतर आधारभूत योजनांकरिता असलेल्या अनुदानाचे वाटप तीन हप्त्यामध्ये करण्याबाबत

**(२८) * ९८२७९ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजना व इतर आधारभूत योजनांकरिता असणारे अनुदान तीन ऐवजी पाच हप्त्यामध्ये मिळणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे लाभार्थ्यांची घरे पूर्ण होण्यास विलंब होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या अनुदानाचे वाटप पूर्वीप्रमाणे तीन हफ्त्यात करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने मार्च, २०१६ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार या योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पासाठी केंद्र शासनाचा हिस्सा ३ हप्त्यात ४०:४०:२० या प्रमाणात वितरीत करण्यात येणार आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विकासक व कंपन्यांनी महानगरपालिकेचा कोट्यवधीचा मालमत्ता कर थकविल्याबाबत

**(२९) * ९७५१७ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील निर्मल लाइफ स्टाईल, फिनिक्स मिल यासारखे मोठ मोठे मॉल आणि लोखंडवाला इन्फ्रा, लार्सन ॲण्ड टुब्रो अशा सुमारे १०० विकासकांनी आणि कंपन्यांनी महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा मालमत्ता कर थकविल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुसार मालमत्त्ता कर थकविणाऱ्या विकासक व कंपन्यांविरुध्द शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) तसेच, उक्त मालमत्त्ता कर वसुल करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील निर्मल लाईफ स्टाईल यांच्या एकूण ९ मालमत्तांचा रु. २०,४२,२२,०३९/- व फिनिक्स मिल यांच्या एकूण ४ मालमत्तांचा रु. ५८,९२,१६,८२७/- इतका मालमत्ता कर थकीत आहे ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, लोखंडवाला ईन्फ्रा व लार्सन ॲण्ड टुब्रो या कंपन्यांचा मालमत्ता कर थकीत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२), (३) व (४) थकीत मालमत्ता कर वसुल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील तरतुदींनुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• निर्मल लाईफ स्टाईलच्या एकूण ९ मालमत्तांना मागणीपत्र बजावण्यात आले असून, तळमजला + २ मजल्यांच्या दोन व्यावसायिक व औद्योगिक वापराची एक अशा एकूण ३ मालमत्तांची जलजोडणी दिनांक २४.०३.२०१७ रोजी खंडीत करण्यात आली आहे.

• तसेच, एक मोकळा भूखंड व एका इमारतीतील क्लब हाऊस आणि कार पार्किंगसाठी असलेला तळमजला + २ मजल्यांची एक इमारत अशा दोन मालमत्तांवर जप्ती व अटकावणीची कारवाई अनुक्रमे दिनांक ०९.०३.२०१५ व दिनांक ०१.१०.२०१५ रोजी करण्यात आली आहे.

• उर्वरित ४ मालमत्तांवर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

• फिनिक्स मिलच्या ४ मालमत्तांपैकी एका मालमत्तेच्या मालमत्ता करापैकी ५०% कराची वसुली दिनांक ०१.०४.२०१५ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आली आहे. मा. न्यायालयाच्या आदेशामुळे उर्वरित ५०% रक्कम वसुल करण्यात आली नाही.

• उर्वरित ३ मालमत्तांना मागणीपत्र बजावण्यात आले असून, पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील धोकादायक इमारतींचा पुर्नविकास करणेबाबत

**(३०) * ९५२१८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनिल बाबर (खानापूर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुमारे १४ हजार मोडकळीस आलेल्या इमारती असून यापैकी तीन हजार इमारतींचा शक्य तितक्या लवकर पुनर्विकास करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्बांधणी आवश्यक असलेल्या इमारतींपैकी १२ हजार १२९ इमारती सन १९४० पूर्वीच्या उपकरप्राप्त इमारती व १४ हजार इमारतींमधील काही इमारती ह्या १०० वर्षापूर्वीच्या तर काही इमारती ४० ते ६० वर्षे जुन्या असून, ४० वर्षावरील सर्वच इमारती धोकादायक असल्याने त्यांचा पुनर्विकास करणे गरजेचे असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संक्रमण शिबिरांची अपुरी संख्या व त्यांची दयनीय अवस्था तसेच वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात रहावे लागत असल्याने धोकादायक इमारतीमधील रहिवासी इमारत खाली करण्यास नकार देत असल्याने पुनर्विकासाचे काम होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दक्षिण मुंबईतील जुन्या इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रश्न मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाने अग्रक्रमावर घेतल्यानंतर मुंबईतील सन १९८४ पासून अद्यापपर्यंत २०२० पुनर्वसन प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दक्षिण मुंबईमधील जुन्या इमारतींच्या २९ प्रकल्पांची मंजूरी रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मुंबई शहर बेटावर एकूण १९,६४२ उपकरप्राप्त इमारती होत्या. त्यापैकी काही इमारती कोसळल्याने तर काही अत्यंत मोडकळीस आल्याने, तोडल्याने, काहींची पुनर्बांधणी / पुनर्विकास झाल्याने, काही इमारती उपकरातुन वगळल्याने आता सन २०१७ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणानुसार प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संख्या १४,२८६ एवढी आहे. सदरहू इमारतीपैकी सुमारे ५५०० इमारतीची दुरुस्ती केलेली असल्यामुळे, भाडेकरु / रहिवाशी व मालक देखभाल करत असल्याने तसेच काही इमारती आरसीसी, फ्रेम्ड स्ट्रक्चरच्या असल्याने त्या सुस्थितीत आहेत व उर्वरित सुमारे ९००० इमारतीची तातडीने पुनर्बांधणी / पुनर्विकास करणे गरजेचे आहे.
(२) सदर १४२८६ इमारतींपैकी १/९/१९६० पुर्वीच्या १२०२९ इमारती असून दि. १/९/१९६० ते ३०/९/१९६९ या कालावधीतील २२५७ इमारती आहेत. यापैकी सुमारे ९००० इमारतींची तातडीने पुनर्विकास करणे गरजेचे आहे, असे मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने म्हटले आहे.
(३) हे अंशतः खरे आहे. मंडळाच्या ताब्यातील संक्रमण शिबीरापैकी ११ संक्रमण शिबीराचा पुनर्विकास करण्यात आला असून, सदर संक्रमण शिबीरात दर्जेदार संक्रमण गाळ्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच १८ संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास प्रगतीपथावर आहे. तरीदेखील धोकादायक इमारतीमधील भाडेकरु / रहिवाशी त्यांची धोकादायक इमारतीतील मुळ खोली करण्यास अडथळा आणतात, त्यांचेविरुध्द म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम ९५ (अ) अंतर्गत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येऊन, त्यांना सुस्थितीतील संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात येते.

(४) हे खरे आहे.

(५) ना-हरकत प्रमाणपत्रातील अटीशर्तींचे पालन न करणे, पुनर्विकासाचे कोणतेही काम सुरू न करणे, भाडेकरूंना पर्यायी भाडे न देणे, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दोन इमारतीमध्ये किमान ६ मिटर मोकळी जागा सोडण्याची अट पूर्ण न करणाऱ्या प्रकल्पांचे ना-हरकत प्रमाणपत्र मुंबई दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाने रद्द केले आहे.

(६) धोकादायक इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी शासन स्तरावर शासन निर्णय क्रमांक-समिती-१५०९/प्र.क्र.८/२०१७/झोपसु-१ दि. ०९.०१.२०१७ अन्वये मंत्रीमंडळाची उपसमिती गठीत करण्यात आली आहे. तसेच शासनाने शासन निर्णय क्र. विमंका-२०१६/प्र.क्र.१४२/दुवपु-१, दि. २९.१०.२०१६ अन्वये ८ विधानसभा/विधान परिषद सदस्यांची समिती गठित केली आहे. सदर समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) व म्हाड अधिनियमात सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे. धोकादायक इमारतींच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातुन अशा इमारतींची दुरुस्ती / टेकू लावणे, धोकादायक भाग पाडून टाकणे, भाडेकरु / रहिवाशी यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरित करण्याचा कार्यक्रम मुंबई दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाकडून प्राध्यानाने हाती घेतला जात आहे

-----------------

## संस्कार ग्रुपने विविध कंपन्यांच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(३१) * ९९७८२ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संस्कार ग्रुप ने विविध कंपन्यांच्या माध्यमातून बचत गट उघडून अशा बचत गटात गुंतवणूक केल्यास आकर्षक व्याजाने परतावा देण्याचे आमिष दाखवून दिनांक १५ मार्च, २०१३ ते माहे फेब्रुवारी, २०१६ या कालावधीमध्ये जवळपास ३५ हजार महिलांसह ५० हजार गुंतवणूकदारांची सुमारे २५० कोटी वा त्याहून जास्त रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात दिघी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी अजूनही फरार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपींना पकडण्यासाठी तसेच गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्यासाठी उपरोक्त प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे द्यावा अशी मागणी गुंतवणूकदारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुंतवणूकदारांच्या मागणीच्या अनुषंगाने फरारी आरोपींना पकडण्यासाठी तसेच या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) संस्कार ग्रुपने विविध कंपन्यांच्या माध्यमातून बचत गट उघडून अशा बचत गटात गुंतवणूक केल्यास आकर्षक व्याजाने परतावा देण्याचे आमिष दाखवून दिनांक १५ मार्च २०१३ ते माहे फेब्रुवारी २०१६ या कालावधीमध्ये एकूण १५९ साक्षीदारांकडे केलेल्या तपासात आतापर्यंत ८,०८,६५,०००/- रूपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

(२) (३) व (४) सदर प्रकरणी सहा आरोपीविरूद्ध दिघी पोलीस स्टेशन येथे गु.र. क्र. ०१/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६७, ४६८, २०१, ३४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनामधील) हितसंबंधाचे रक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हा तपासावर आहे. सदर गुन्ह्यातील गुंतवणूकदार यांनी गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्याबाबत मागणी केलेली नाही. परंतु सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक पोलीसांनी आर्थिक गुन्हे शाखेच्या मदतीने करावा असे पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांनी आदेश दिले आहेत. तसेच सदर गुन्ह्यातील उर्वरीत ५ आरोपींना अटक करण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असून त्यांच्या लुकआऊट नोटीस काढलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत के/पूर्व विभागातील प्रकल्पबाधितांच्या सदनिका ताब्यात घेण्याबाबत

**(३२) * १०१९०५ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकसित होत असलेल्या प्रकल्पामध्ये के/पूर्व विभागाच्या हद्दीत ७३ प्रकल्पामधून ४१५४ प्रकल्पबाधितांना सदनिका मिळणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही प्रकल्प पूर्ण होऊन १० ते १५ वर्षाचा कालावधी उलटूनही त्यातील प्रकल्पबाधितांसाठीच्या सदनिका प्राधिकरणाने तांत्रिक बाबी पुढे करून ताब्यात घेतल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यापैकी काही सदनिका पी.ए.पी.या विकासकाने परस्पर विकल्याबाबत व काही सदनिका भाडेतत्वावर दिल्याबाबत प्राधिकरणाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, के/पूर्व विभागातील आजपर्यंत बांधून तयार असलेल्या प्रकल्पबाधितांच्या सदनिका प्राधिकरणाने ताब्यात घेऊन के/पूर्व विभागातील रस्ता रुंदीकरण, नाले रुंदीकरण, मनोरंजन मैदान या मधील प्रकल्पबाधितांना सदर सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) के/पूर्व विभागात एकूण ८० योजनेमध्ये ४९८८ प्रकल्प बाधित सदनिका दिसून येत असून विकसित होत असलेल्या प्रकल्प बाधित सदनिकांची संख्या ही त्यांच्या पात्र-अपात्रते नुसार कमी जास्त होत असते असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रत्येक पी.ए.पी. युक्त प्रकल्पांची कालबध्द पध्दतीने पडताळणी करुन गैरप्रकार आढळल्यास नियमोचित कार्यवाही करण्याबाबत प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मिळकत व्यवस्थापन विभाग तयार केलेला असून सदर विभागामार्फत प्रकल्पबाधीत सदनिका उपलब्ध झाल्यावर त्या सदनिकांचे व्यवस्थापन व वाटपाच्या संबंधिचे काम करण्यात येत असल्याबाबत प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील वडगाव शेरी भागातील पाणी माफिया व महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी संगनमताने पाण्याची विक्री करीत असल्याबाबत

**(३३) * ९९९२४ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वडगाव शेरी भागातील पिण्याच्या पाण्याची तांत्रिक अडचण होत असल्याचे पाहून या भागातील पाणी माफिया महानगरपालिकेच्या काही अधिकारी व कर्मचा-यांशी संगनमत करुन कमी दराने पाणी खरेदी करुन नागरिकांना जादा दराने टँकरद्वारे विकत असल्यामुळे ते महानगरपालिकेची व नागरिकांची फसवणूक करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार नागरिकांनी महानगरपालिकेकडे करुन देखील त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रार करुन देखील संबंधित अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द कारवाई करण्यास विलंब करित असल्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) वडगावशेरी भागात काही वेळा विज खंडीत होणे, पाणी गळती, भौगोलिक स्थिती, इत्यादी कारणामुळे पाणी पुरवठ्यामध्ये अनियमितता होते. त्यामुळे याभागातील नागरिकांना कमी दाबाने व अपुरा पाणी पुरवठा होतो, ही वस्तुस्थिती आहे.

ज्यावेळी वडगावशेरीतील काही भागात वरीलप्रमाणे अपुरा पाणी पुरवठा होतो, त्यावेळी तेथील नागरिकांच्या पाण्यासाठी तक्रारी प्राप्त होतात हे खरे आहे.

सदर ठिकाणावरील पंपिंग टँकर भरणा केंद्रातून टँकरव्दारे व गावठाणातील काही गावात पंपिंगव्दारे पाणीपुरवठा केला जातो.

या केंद्रावरून सुमारे १८ ते २० खाजगी पासधारकांना टँकर भरून मिळण्यासाठी परवानगी दिली आहे. असे सुमारे ११० ते १३० टँकर प्रतिदिनी पाणीपुरवठा करतात.

निविदा काढून घेतलेले टँकर व महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या टँकरमार्फत विनामुल्य पाणीपुरवठा केला जातो.

खाजगी टँकरना पुणे महानगरपालिकेमार्फत रूपये ४७३ व रूपये ५७३ या दराने पाणीपुरवठा करण्यात येतो. तथापि, सदर टँकरव्दारे करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याचे दर निश्चित नाहीत. असे दर निश्चित करून देण्याबाबत पुणे महानगरपालिकेस सूचना देण्यात येत आहेत.

सदरच्या ठिकाणी प्रत्येक टँकरला जी.पी.एस. यंत्रणा बसविलेली असून फक्त पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्येच पाण्याचा पुरवठा केला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खेड (जि.रत्नागिरी) नगरपालिका हद्दीतील भूखंड शिवतेज आरोग्य सेवा संस्थेस बेकायदेशीरपणे दिल्याबाबत

**(३४) * १०२१६६ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) नगरपालिका हद्दीतील सिटी सर्वे नं.१४९०, १६०० चौरस मीटर हे क्षेत्र पूररेषेखाली येणा-या बाधित आरक्षित क्षेत्रामध्ये येत असूनही नगरपालिकेने हा भूखंड शिवतेज आरोग्य सेवा संस्थेस नियमबाह्यरिता व महसूल आणि बांधकाम विभागांची परवानगी/ना हरकत प्रमाणपत्र न घेता वार्षिक १०० रुपये या अल्प दरात दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड शहराची विकास योजना ही शासनाच्या नगर विकास व आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.टि.पी.एस.१५७२/५७५२५/डब्लु-२ दिनांक ४ जानेवारी, १९७४ अन्वये मंजूर असून सदरहू जागा हरित क्षेत्र म्हणून आरक्षित असतानाही खेड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांनी सदरहू संस्थेस ही जागा मिळावी याकरिता दिनांक ३० मे, २००६ रोजी वा त्या सुमारास सचिव, नगरविकास विभाग यांना पाठविलेल्या पत्रात "या जागेवर कोणतेही आरक्षण नाही" असे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्राद्वारे खोटी माहिती देऊन संस्थेचा फायदा होण्याच्या दृष्टीने सन २००६ मध्ये महानगरपालिकेने मान्यता मिळवली व उक्त जागा दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास दरवर्षी रु.१०० फक्त या दराने भाडेतत्वावर दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू संस्थेने या जागेवर बांधकाम करतानाही नियमांचा भंग केला असून सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही व्यवस्था न केल्याने खांबतळ्यातील पाणी दुषित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाची तक्रार मा. लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाली आहे.

(५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीतील मुद्द्यांची मुद्देनिहाय चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील डेंग्यू रोगाचा प्रसार रोखण्याबाबत

**(३५) * ९५३६४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात डेंग्यूच्या आजारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून अद्यापपर्यंत ४ हजार संशयित रुग्ण आढळून आले असून त्यांपैकी ६ जणांचा मृत्यू झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडून डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी योग्य प्रकारे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात न आल्याने रुग्णांमध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डेंग्यूच्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात जानेवारी, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत डेंग्यू आजाराने बाधीत असलेल्या संशयीत रुग्णांची संख्या ५,७६७ असून निश्चित निदान झालेल्या रुग्णांची संख्या १४९७ इतकी आहे. त्यापैकी ५ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे.

(२) व (३) अनियमीत व दिर्घकाळ पावसामुळे डेंग्यू आजाराच्या प्रमाणात वाढ झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

तथापी सदरच्या आजारावर प्रतिबंध करण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी खालील उपाययोजना करण्यात येतात -

- साथीच्या रोगाचे नियमीत सर्वेक्षण करण्यात येते.
- किटकजन्य आजाराच्या प्रतिबंधासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात येते.
- किटकजन्य आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी किटकनाशक औषधांची फवारणी व धुम्र फवारणी करण्यात येते.
- सार्वजनिक क्षेत्रातील आरोग्य अधिकारी व निम्न वैद्यकिय कर्मचारी व खाजगी वैद्यकिय व्यावसायीक यांना पावसाळा व त्यानंतर उद्भवणाऱ्या आजारांचे निदान, उपचार, प्रतिबंध व नियंत्रण याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.

- साथीच्या रोगाच्या निदानासाठी आवश्यक प्रयोगशालेय सुविधा उपलब्ध आहेत.
- औषध व इतर साधन सामुग्रीचा आवश्यक साठा उपलब्ध करून दिला जातो.
- घनकचरा व्यवस्थापन, जल, अतिक्रमण, ड्रेनिज इ. विभागांशी समन्वय साधण्यात येतो.
- विविध जनसंपर्क माध्यमातून लोकप्रबोधन करण्यात येते.
- डासोत्पत्तीस कारणीभूत व्यक्ती / संस्था यांना ही स्थाने नष्ट करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलुंड-गोरेगांव लिंकरोडवर रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत

**(३६) * ९९६६६ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड-गोरेगांव लिंकरोडवर रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या २१,५९३ चौ.मीटरचा भूखंड सन २०१३ मध्ये महानगरपालिकेला सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या उभारणीसाठी मिळाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या उभारणीसाठी रुपये १५० कोटींची तरतूद केली असतांनाही महानगरपालिका आयुक्तांनी सदर भूखंडावरील सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या उभारणीबाबत काहीच निर्णयात्मक कार्यवाही न केल्याने झालेल्या विलंबामुळे सदर भुखंडापैकी ८०० चौ.मीटरचा भूखंड खासगी विकासकाला मा.न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई महानगरपालिकेला द्यावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलुंड, भांडुप, विक्रोळी परिसरातील हजारो रुग्णांसाठी सुपरस्पेशालिटी रुग्णालयाची आवश्यकता असतांनाही व रुग्णालय उभारणीसाठी रुपये १५० कोटीच्या निधीची तरतूद असतांनाही अद्यापपर्यंत रुग्णालय बांधण्याच्या दृष्टीने निर्णयात्मक कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत व यासाठी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) विकास नियंत्रण नियमावली ५७(४)(क) अन्वये मौजे नाहूर येथील औद्योगिक क्षेत्रात वसलेल्या न.भू.क्र. ६८१/७, ६८१/८, ६८१/९, ६८१/११ व ६८१/१२ या भूखंडावर निवासी वापर अनुज्ञेय करतांना १८,७६५.३० चौ.मी. चा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस "विकास हस्तांतरण हक्काच्या" मोबदल्यात माहे नोव्हेंबर २०१३ मध्ये उपलब्ध झाला आहे.

माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये सदर सुविधा भूखंडावर प्रारुप विकास आराखडा २०३४ मध्ये रुग्णालयाचे आरक्षण दर्शविण्यात आले आहे.

(२) सदर भूखंडावरील रस्याचे क्षेत्रफळ सुविधा भूखंडामध्ये समायोजित करण्यापकरिता विकासकाने मा.उच्चम न्यायालय, मुंबई मध्ये याचिका दाखल केली होती.

सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९.१०.२०१५ रोजी निकाल देतांना विकासकाची सदर विनंती मान्य केली होती.

सदर आदेशाविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या आव्हान याचिकेत, मा.उच्च न्यायालयाचा निर्णय दिनांक ११.०१.२०१६ रोजी कायम ठेवण्यात आला आहे.

तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर सुविधा भूखंडामधून ८२०९.३० चौ.मी. चा भूखंड विकासकास परत करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी विकासकास परत करण्यात आलेला सुविधा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मल्टी स्पेधशालिटी रुग्णानलयाच्यार एकत्रित विकास करण्याकरिता पुन्हा अधिग्रहण करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) व (४) सदर भूखंडावर अंदाजे ३६० रुग्णशय्येचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारणीसाठी नियुक्ती करण्यात आलेल्या सल्लागारांमार्फत आराखडे तयार करण्यात आले असून, निविदा प्रक्रिया सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रथमत: सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. ५० लाख व तद्नंतर प्रतिवर्षी रु. १० लाख इतक्या नाममात्र रकमेची (टोकन प्रोव्हिजन) तरतूद करण्यात आली आहे.

-----------------

## शेवगाव (जि.अहमदनगर) येथील शेतक-यांच्या आंदोलनात जाळपोळ व हिंसाचार करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत

**(३७) * १०३१५३ श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊसाला प्रतिटन ३१००/- रु. भाव मिळावा या मागणीसाठी शेवगाव (जि.अहमदनगर) येथे शेतकऱ्यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केलेले आंदोलनातील निर्माण झालेला हिंसाचार शांत करण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खानापूर (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथे पोलिसांच्या गोळीबारात २ जण जखमी झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेकऱ्यांचे आंदोलनात जाळपोळ व हिंसाचार करणाऱ्या गुन्हेगारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) आंदोलनाची परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलीसांनी आकाशाच्या दिशेने २ ब्लँक राऊंड फायर केले. परंतु, जमाव अधिक हिंसक झाल्याने व जमावाला सूचना देवूनही जमाव शांत न झाल्याने एस.एस.आर. रायफल मधून ३ प्लॅस्टीकचे राऊंड फायर केले. त्यानंतर जमावाच्या दिशेने शॉटगनमधून ७ स्प्लिंटर फायर केले. त्यामधील छऱ्याने जमावातील २ इसम किरकोळ जखमी झाले. जखमी इसमांनी अहमदनगर मधील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतला असून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.
(३) सदर घटनेबाबत शेवगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३९८/२०१७ भा.दं.वि. कलम ३०७, १४३, १४७, १४८, १४९, ४३५, ३५३, ३३२, ३३३, ३४१, ३३७, ३३८, ४२७, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विरुपणास प्रतिबंध अधिनियम कलम ३, ७ व क्रिमीनल लॉ-अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ व म. पो. ॲक्ट कलम ३७(१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी १६ आरोपी निष्पन्न झाले आहेत. यापैकी १० आरोपींना अटक केली असून सध्या ते जामीनावर मुक्त आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जायका प्रकल्पाचे भूसंपादनाचे काम जलदगतीने होण्याबाबत

**(३८) * ९९५२९ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी व शहरातील सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया होण्यासाठी महानगरपालिका मुळामुठा संवर्धन प्रकल्पांतर्गत १३ नवे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया करण्यासाठी केंद्र शासनाने महानगरपालिकेला मार्च महिन्यात रुपये २६ कोटी दिले होते व त्या मधून ८.९१ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करणे अपेक्षित होते परंतु पाच महिन्यानंतरही केवळ १.२४ हेक्टर जमिनिचेच संपादन झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या निविदा प्रक्रियेसाठी केंद्र शासनाकडून सल्लागाराची नियुक्ती झाली नसल्याने विलंब होत असल्याचा दावा महानगरपालिका प्रशासन करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जायका प्रकल्पाचे भूसंपादनाचे काम जलदगतीने होणे व यामध्ये विलंब करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहरामध्ये राष्ट्रीय नदी संवर्धन कृती कार्यक्रमांतर्गत एकूण ११ मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारण्यात येणार आहेत हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाने पुणे महानगरपालिकेस सदर प्रकल्पांसाठी अद्यापपर्यंत रूपये २५.९९ कोटी एवढी रक्कम दिलेली आहे हे खरे आहे. या निधीपैकी भूसंपादन प्रक्रियेसाठी अद्यापपर्यंत रूपये १७ कोटी २३ लाख एवढी रक्कम जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे भरणा केलेली असून रूपये ५ कोटी ३१ लाख एवढी रक्कम भरणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

भूसंपादनाचे क्षेत्र : -

• या प्रकल्पांच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी एकूण ९.६० हे. क्षेत्र संपादीत करणे अपेक्षित आहे.

• त्यापैकी ०.२३ हे. इतके ॲमिनिटी स्पेसचे क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आले आहे.

• वारजे, वडगाव खुर्द आणि मुंडवा येथील प्रकल्पांसाठी भूसंपादन प्रक्रिया राबवून सुमारे ४२३२८.५५ चौ.मी. जमिनीचे संपादन करण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि, यापैकी कोणत्याही जमिनीची संपादनाची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

• उर्वरित प्रकल्पांचे भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

(३), (४) व (५) भूसंपादनासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध नसणे, ऑनलाईन पध्दतीने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे रक्कम भरण्यासाठी झालेल्या अडचणी यामुळे भूसंपादनाच्या कार्यवाहीस विलंब झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, वारजे व वडगाव (बु.) या प्रकल्पासाठीची रक्कम जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे भरणा केली असून मुंडवा प्रकल्पासाठीची रक्कम भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

या योजनेसाठी सल्लागार नेमणूक लवकरात लवकर करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे.

-----------------

## मुंबई मधील महानगरपालिकेच्या एम वॉर्डमध्ये नागरिकांना पाणी विकत घ्यावे लागत असल्याबाबत

**(३९) * ९५०१८ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथील एम वॉर्डमध्ये ८१ हजार ४३७ कुटूंबे पाणी विकत घेत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानखुर्द-शिवाजीनगर मधील एम-पूर्व प्रभागातील सुमारे ५० टक्के नागरिकांचे दरमहा उत्पन्न रु.६ हजारापेक्षा कमी असतानाही येथे वर्षाकाठी ८८ कोटी रुपयांचे पाणी विकले जात असल्याची बाब अपनालय संस्थेने शिवाजीनगर भागातील नागरिकांच्या आयुष्यावर आधारित तयार केलेल्या लाईफऑन दि मार्जिन चर्टिंग रिअलिटीज या अहवालात नमूद केल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवाजी नगरात ६ लाख रहिवाशी रहात असून त्यांचे दरमहा उत्पन्न सहा हजाराहून कमी आहे, त्यांचे दरडोई उत्पन्न ४० रुपये असून दोन लाख १० हजार रहिवाशांच्याकडे शिधापत्रिका नसल्याचे उपरोक्त अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागातील नागरिकांना दररोज पिण्यासाठी आणि अन्य गरजांसाठी पाणी विकत घ्यावे लागत असून वर्षाला ८८ कोटी रुपये पाण्यासाठी मोजावे लागत असल्याचेही सदर अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईसारख्या शहरात गोरगरीब लोकांना पाण्यासारख्या अत्यावश्यक बाबींसाठी पैसे देऊन पाणी विकत घ्यावे लागत असून महानगरपालिकेचेच पाणी विकून करोडो रुपये कमविणाऱ्या पाणी पुरवठादार व त्यांना सहाय्य करणारे महानगरपालिकेचे अधिकारी यांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच एम वॉर्डमधील पाणी समस्या सोडविण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) "गोवंडीमध्ये पाणीबाणी" अशा आशयाची बातमी दिनांक १४.०९.२०१७ रोजीच्या दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) दिनांक १४.०९.२०१७ रोजीच्या दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि, अपनालय या संस्थेने शिवाजीनगरमधील नागरिकांचे दरमहा उत्पन्न व त्यांच्याकडून पाणी खरेदी करण्याकरिता केलेला खर्च याबाबतची माहिती कोणत्या आधारावर प्राप्त केली याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे कोणतीही माहिती उपलब्ध नाही अथवा त्याबाबतची कोणतीही माहिती सदर संस्थेने महानगरपालिकेस कळविलेली नाही.

(५) व (६) गोवंडी “एम” वॉर्डमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• रफिक नगर येथील बहुतांश भाग व संत निरंकारी नगर या परिसरातील ६७७ ठिकाणी जलजोडण्या देण्यात येऊन दिनांक ११.०५.२०१७ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

• उर्वरित भागात जलजोडण्यांसाठी देवनार डंपिंग ग्राऊंड येथे १८०० मी. लांबीची व ७५० मिमी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे व तेथील अंतर्गत परिसरात जलवाहिन्यांचे जाळे टाकण्याचे काम जानेवारी २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

• त्यादरम्यान तेथील रहिवाशांना त्यांच्या मागणीनुसार खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

• सदर परिसरातील वाढलेल्या लोकसंख्येचा विचार करता, मागील १० वर्षांत तेथील पाणी पुरवठयात १० द.ल.लि. ते २२ द.ल.लि. इतकी वाढ करण्यात आलेली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तोंडचीर (ता.उदगीर, जि.लातूर) येथील अवैध देशी दारू विक्रीला विरोध करणाऱ्या महिलेस उदगीर ग्रामीण पोलिसांनी केलेली मारहाण

**(४०) * १०३०७३ ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोंडचीर (ता.उदगीर, जि.लातूर) येथील अवैध देशी दारू विक्रीला विरोध करणाऱ्या मंगल जाधव या महिलेस उदगीर ग्रामीण पोलिसांनी मारहाण केल्याचे तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी याबाबतच्या तक्रारीची दखल घेतली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारदार महिलेस उदगीर पोलीस ठाण्याच्या कोठडीत रात्रभर बंद करून तेथील पोलिसांनी तिला अमानुषणे मारहाण केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच उपरोक्त ठिकाणी सूरू असलेली अवैध दारू विक्री बंद करण्याबाबत व राज्यात दारूबंदी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) दि.१५/०९/२०१७ रोजी मंगल जाधव व त्यांचेविरोधातील सरोजना जाधव यांनी परस्पर विरोधी विनयभंगाच्या तक्रारी दिल्या होत्या. सदर दोन्ही महिलांच्या तक्रारी महिला पोलीस कर्मचारी व महिला दक्षता सदस्या यांच्या उपस्थितीत दाखल करून घेण्यात आल्या आहेत. परंतु सरोजना जाधव यांचे तक्रारीवरून मंगल जाधव यांचे विरूध्द गुन्हा दाखल करीत असताना मंगल जाधव यांनी सरकारी काम करण्यास मज्जाव करून सरकारी कामात अडथळा केल्याने त्यांचेविरुध्द उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३७१/२०१७ कलम ३५३, ३२३, ५०४, ५०६ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून गुन्ह्यात आरोपी महिलेस अटक करून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणी सदर महिलेस पोलीसांनी मारहाण केली नसल्याचे वैद्यकीय अहवालावरून निष्पन्न झाले आहे.

(५) तोंडचीर (ता.उदगीर, जि.लातूर) येथे देशी दारूची चोरटी विक्री करणाऱ्या २ आरोपींविरूध्द दारूबंदी नियमान्वये कारवाई करण्यात आलेली असून कलम ९३ म.प्रो.अॅक्ट, कलम ११० ई.ग., कलम १०७ नुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, राज्यात चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली या जिल्हयात दारुबंदी करण्यात आली असून इतर जिल्हयात दारुबंदी कायद्यान्वये मद्याचे सर्व व्यापार नियंत्रित आहेत.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## मिरा-भाईंदरच्या विकास आराखड्यामध्ये आर झोन क्षेत्रात फेरफार करुन विकासकांना कोट्यवधी रुपयांचा फायदा करुन दिल्याबाबत

**(४१) * ९५१५१ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदरच्या सन १९९७ च्या विकास आराखड्यामध्ये विकासकांना कोट्यवधी रुपयांचा फायदा होण्याकरीता आर झोन क्षेत्रात फेरफार करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविल्याप्रकरणी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये शामसुंदर अग्रवाल, शैलेश शहा, मनोज पुरोहित, रतिलाल जैन या विकासकांना तसेच कारकून बबन पारकर इत्यादी यांना फसवणूक व गैरव्यवहाराच्या गुन्हयात अटक करण्यात आल्याची बाब दिनांक १६ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर झोन मधील विविध १४ सर्व्हे क्रमांकातील भूखंडाबाबत तपास सुरु असल्याने कोणत्याही प्रकारची नोंदणी करण्यात येऊ नये, असे लेखी कळविले असतांनाही नोंदणी विभागातील अधिकाऱ्यांनी या चौदाही भूखंडावरील इमारतींची नोंदणी करुनसुध्दा तपास अधिकारी भरत शेळके व तत्कालीन पोलीस आयुक्त यांनी विकासक व संबंधीत नोंदणी अधिकारी यांचेविरुध्द कोणतीही कायदेशीर कारवाई केली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर झोन घोषित केलेल्या क्षेत्राला नागरी जमिन कमाल धारणा कायदा लागू असतांनाही, तत्कालिन अप्पर जिल्हाधिकारी भास्कर वानखेडे, महानगरपालिका अधिकारी सत्यवान धनेगावे व दिलीप घेवारे यांनी सदर क्षेत्र जमीन कमाल धारणा कायद्याच्या तरतूदी लागू होण्यापासून मुक्त असल्याचे विकासकांना पत्र देऊन, विकासकांचा कोट्यवधी रुपयांचा आर्थिक फायदा व शासनाचा तोटा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदरच्या गुन्हयात केलेल्या तपासामध्ये निष्पन्न झालेले विकासक आरोपी यांना अटक करुन त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहेत. परंतु, नोंदणी अधिकारी यांना नोंदणी अधिनियम व नियम यातील तरतुदीनुसार मिळकतीची कायदेशीर बाब मालकी हक्क पाहण्याचा अधिकार नसल्याने व सदरची बाब नोंदणी अधिकारी यांच्या कक्षेतील नसल्याने, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

तत्कालिन अपर जिल्हाधिकारी भास्कर वानखेडे यांनी सन २००० सालानंतर पदावर कार्यरत नसतांना देखील मागील तारखेचे सदर क्षेत्र जमीन कमाल धारणा कायद्याच्या तरतुदी लागु होण्यापासून मुक्त असल्याचे बनावट प्रमाणपत्र हे कार्यालयाबाहेर तयार करुन बेकायदेशीररित्या विकासकांना दिले व विकासकांचा कोट्यवधी रुपयांचा आर्थिक फायदा व शासनाचा तोटा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात आरोपी करण्यात आले. परंतु, ते दि. २०.१०.२०१४ रोजी मयत झाल्याने त्यांच्यावर मा.न्यायालयात ॲबेटेड समरी पाठविण्यात आलेली आहे.

तसेच, तपासात इतर अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे सकृतदर्शनी आढळून आलेले नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी चौकशीअंती ठाणे नगर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे गु.र.क्र. २०१/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६७, ४६८, ४७०, ४७१, १२० (ब) सह कलम १३ (१) (ड) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये ६ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमूद गुन्ह्यातील ५ आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीराम अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर लि. या विकासकाने बेकायदेशीररित्या एफएसआय वापरून केलेला गैरव्यवहार

**(४२) * १०१४५६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीराम अर्बन इन्फ्रास्टक्चर लि.च्या विकासकाने जी/दक्षिण मधील गणपत कदम मार्ग लोअर परेल येथील सब प्लॉट क्र. ५ बी+६, सीटी सर्व्हे क्र.२८८, २८९, ३१०, १/१५४०,२/१५४०, १५४७, १५४९, १/१५३९ व १५५० या भूखंडावर पॅले रॉयल प्रकल्प उभारताना बेकायदेशीररित्या निवासी वसाहत आणि सार्वजनिक वाहनतळाचा एफएसआय वापरून केलेल्या गैरव्यवहारासंदर्भात श्री.इफतेखार ए.शहा सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकारी कार्यकर्ते यांनी सविस्तर तक्रारी दिनांक ३० मे, २१ जून, १८ जुलै व ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी मा.नगरविकास राज्यमंत्री, आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर), उप मुख्य अभियंता (बी/पी), सीटी, सहाय्यक आयुक्त, जी/दक्षिण विभाग आदिंकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू तक्रारीनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) मे.जनहित मंच यांनी पॅले रॉयल इमारतीच्या बांधकामासंबंधी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक ४३/२०१२ दाखल केली होती.

सदर याचिकेत मा.न्यायालयाने दिनांक १३.०५.२०१३ रोजी दिलेल्या आदेशास मे. जनहित मंच यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून, सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या व्दिसदस्यीय खंडपीठाने दिनांक २४.०४.२०१४ रोजी आदेश दिले होते.

तथापि, सदर आदेशामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या आदेशामध्ये मतभिन्नता झाल्याने सदर याचिकेची सुनावणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर न्यायप्रविष्ठ आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## बुलढाणा शहरातील वाहतूक सिग्नल यंत्रणा बंद असल्याबाबत

**(४३) * ९६४२५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरात कार्यन्वित असलेली व नगरपरिषद बुलढाणा यांनी दिनांक १४ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हा पोलीस प्रशासनाकडे हस्तांतरीत केलेली वाहतुक सिग्नल यंत्रणा बंद असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुरे वाहतूक पोलिस बळ व पोलीस दलाच्या दुर्लक्षामुळे सदर वाहतूक सिग्नल यंत्रणा बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार बुलढाणा शहरातील बंद असलेली वाहतूक सिग्नल यंत्रणा सुरु करण्याबाबत व त्यासाठी आवश्यक वाहतूक पोलिस बळ उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नगर परिषद, बुलढाणा यांचेकडून दिनांक १५.०४.२०१६ रोजी सिग्नल यंत्रणा पोलीस स्टेशन, बुलढाणा यांचेकडे हस्तांतरणाबाबत कळविले आहे. सदरची सिग्नल यंत्रणा तांत्रिक बिघाडामुळे ब्लिंकिंग मोडवर होती. त्यानुसार बुलढाणा पोलीसांकडून नगर पालिका प्रशासनाला सिग्नल यंत्रणेतील त्रुटींची पुर्तता करणेबाबत कळविण्यात आले होते. नगर पालिका प्रशासनाकडून सदर सिग्नल यंत्रणेतील त्रुटींची पुर्तता करण्यात आल्याने दिनांक ११.१२.२०१७ रोजी सिग्नल यंत्रणा सुरु करण्यात आलेली आहे.

शहरातील वाहतुक नियंत्रणाकरीता वाहतुक पोलीस बळ पुरेसे असून शहरातील ५ सिग्नलवर एकूण ७ वाहतुकी पोलीस कर्मचाऱ्यांची डयूटी लावण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वालिव (जि.पालघर) पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांकडून भूमाफियांवर कारवाई करण्यास होत असलेला विलंब

**(४४) * १०३००६ श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सातिवली (जि.पालघर) येथील सर्व्हे क्र.२, सर्व्हे क्र.१२ (हिस्सा क्र.२), सर्व्हे क्र. ६६, तसेच सर्व्हे क्र.६८ या मिळकती भू-माफियांनी बनावट कागदपत्र आणि स्वाक्षऱ्यांच्या आधारे अन्य व्यक्तींना विक्री केल्याचे प्रकरण तपासून प्राधान्याने आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे आदेश जिल्हा पोलीस अधिक्षक, पालघर यांना मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांनी दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वालिव पोलीस ठाण्याचे अधिकारी संबंधित भूमाफियांवर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करीत असून तपासात संबधित भूमाफियांकडील सदर प्रकरणातील बनावट कागदपत्रे दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास हस्तगत केलेल्यानंतरही अद्यापपर्यंत या भूमाफियांविरुद्ध कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे विभागाकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार सदर प्रकरणातील दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर तसेच संबंधीत भुमाफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. परंतु सदरचे पत्र दिनांक ३०.५.२०१७ रोजी दिलेले नसून ते दिनांक ७.११.२०१७ रोजी दिलेले आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी चौकशीअंती वालीव पोलीस ठाणे, पालघर येथे गु.र.क्र. ७६६/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, १२० (ब), ३४ अन्वये ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमूद गुन्हा तपासाधिन आहे.

सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे विभागाकडे वर्ग करण्याची बाब सद्यस्थितीत विचाराधिन नाही.

तसेच, या प्रकरणी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची कसुरी आढळून आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्मार्ट सिटी योजनेंतर्गत निवड झालेल्या शहरातील कामे संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(४५) * १०२१९१ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दहा शहरांची स्मार्ट सिटी योजनेंतर्गत निवड झालेली असून या शहरांतील कामे संथ गतीने सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षात बारा हजार कोटी रुपयांची कामे पूर्ण होणे अपेक्षित असताना आतापर्यंत आठ शहरांची सुमारे २११ कोटी रुपयांची कामे पूर्ण झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत एकूण किती प्रकल्प कार्यान्वित करावयाचे आहेत, त्यासाठी किती खर्च निश्चित करण्यात आलेला आहे, प्रत्यक्षात किती प्रकल्पांची कामे सुरु करण्यात आलेली आहेत व सदर प्रकल्पांवर माहे ऑक्टोबर, २०१७ अखेरपर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उर्वरित प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे, त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी केव्हा पर्यंत उपलब्ध करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यातील १० संभाव्य शहरांपैकी ८ शहरांची स्मार्ट शहरे म्हणून विकसीत करण्यासाठी केंद्र शासनाने निवड केली आहे.

• उर्वरीत २ शहरांच्या निवडीसाठी केंद्र शासनास शिफारस करण्यात आली आहे.

• केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक स्मार्ट सिटीसाठी विशेष उद्देश वहनाचे (एस.पी.व्ही.) गठण करण्यात आले आहे.

• सदर एस.पी.व्ही. ना सर्व प्रशासकीय तसेच वित्तिय अधिकार देण्यात आले असून प्रकल्प कालमर्यादेत राबविण्याची पूर्ण जबाबदारी एस.पी.व्ही. ची आहे.

• या अभियानांतर्गत एकूण रु. १९९.०७ कोटीचे १७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. रु. १०४५.३७ कोटी किंमतीच्या २९ प्रकल्पांची कामे सुरु झाली आहेत.

• तसेच, रु. ६९६.६ कोटी किंमतीच्या ९ प्रकल्पांची कामे निविदाधीन असून उर्वरीत प्रकल्पाच्या कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहेत.

(२) • स्मार्ट सिटी योजना जून २०१५ मध्ये सुरु झाली असून स्मार्ट सिटी चॅलेंज अंतर्गत राज्यातील ८ शहरांची निवड ही ३ विविध टप्प्यांमध्ये जानेवारी २०१६ ते जून २०१७ या कालावधीत झाली आहे.

• तद्नंतर केंद्र शासनाच्या सुचनेनुसार विशेष उद्देश वहनांचे (एस.पी.व्ही.) गठन झाले असून त्यानंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती, डी.पी.आर. तयार करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे इत्यादी बाबींची पूर्तता करून रु.१९९.०७ कोटी

किंमतीची १७ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत, हे खरे आहे.

(३) व (४) • स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत आत्तापर्यंत निवड झालेल्या ८ शहरात मिळून एकूण २८५ प्रकल्प कार्यान्वित करावयाचे आहेत. त्यासाठी रू.१९,४५६.३ कोटी खर्च निश्चित करण्यात आला आहे.

• आत्तापर्यंत रु. १९९.०७ कोटीचे १७ प्रकल्प पूर्ण झाले असून, रु. १०४५.३७ कोटींच्या २९ प्रकल्पासाठी कार्यादेश देण्यात आलेले आहेत, तसेच रु. ६९६.६ कोटींचे ९ प्रकल्प निविदा प्रक्रियेत आहेत. उर्वरित प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहेत.

• एकूण निवड झालेल्या ८ शहरांना त्यांचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु. १९४५६.३० कोटी रकमेची आवश्यकता आहे. या ८ शहरांना केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून एकूण रू. ८००० कोटी इतका निधी अभियान कालावधीत उपलब्ध होणार आहे.

• उर्वरीत निधी संबंधित शहराच्या स्मार्ट सिटी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सार्वजनिक खाजगी भागीदारी (पी.पी.पी.), महानगरपालिका निधी, इतर योजनांतील निधी रूपांतरण (कनव्हर्जनस) इत्यादी विविध मार्गांनी उपलब्ध होणे प्रस्तावित आहे.

• या योजनेतील विविध टप्प्यांवरील सर्व प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना विशेष उद्देश वहनास (एस.पी.व्ही.) देण्यात आल्या आहेत.

-----------------

## कोल्हापूर शहरातील बेलबाग येथील प्राईम न्युरो अँड स्पाईन इंन्सेन्टीव्ह केअर युनिट मधील डॉक्टरांकडे न्युरोसर्जनचा परवाना नसताना रुग्णांवर उपचार करीत असल्याबाबत

**(४६) * ९८१९४ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील बेलबाग येथील प्राईम न्युरो अँड स्पाईन इंन्सेन्टीव्ह केअर युनिट मधील डॉ.कौस्तुभ वाईकर व सौ. अनुष्का वाईकर यांच्याकडे न्युरोसर्जन असल्याचा परवाना नसताना त्यांनी रुग्णावर शस्त्रक्रिया व उपचार केल्याने रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रुग्णांच्या नातेवाइकांनी कोल्हापूर जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, डॉ.कौस्तुभ वाईकर यांनी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधीवर रुपये ५ लाख खंडणी मागीतल्याचा गुन्हा जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दाखल केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त स्थानिक लोकप्रतिनिधीवर दाखल केलेला सदर गुन्हा हा खोटा असून राजकीय बदनामीच्या हेतूने केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित डॉक्टरवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्या येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कोल्हापूर शहरातील डॉ. कौस्तुभ वाईकर यांच्याकडे न्युरोसर्जरीमध्ये कोणतीही विशेष आर्हता नसतांना फिर्यादी यांच्या मुलाच्या मेंदुविकारावरील ऑपरेशन निष्काळजी पणे करुन मुलाच्या मृत्युस कारणीभूत झाल्याने त्यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा व आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशा मजकुराचा अर्ज मयत मुलाच्या नातेवाईकांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे दिला आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

प्राईम न्युरो अँड इन्सेन्टीव्ह केअर युनिटचे डॉ. कोस्तुभ वाईकर यांनी रु. ५ लाखाची खंडणी मागीतल्या प्रकरणी जुना राजवाडा पो.स्टे. येथे गुन्हा दाखल नाही. परंतु श्री. वाईकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संबधित लोकप्रतिनिधीचे खाजगी स्वीय सहायक यांनी ५ लाख रुपये खंडणी मागीतल्या प्रकरणी त्यांच्या विरुध्द जुना राजवाडा पो.स्टे. गु.र.नं. २७६/२०१७ भा.दं.वि. कलम ३८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासात सदर गुन्हा खोटा व राजकिय बदनामीच्या हेतूने केल्याचे निष्पन्न झालेला नसून आरोपीविरुध्द सबळ पूरावा मिळाला असल्यामुळे आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(५) डॉ.कौस्तुभ वाईकर व डॉ. अनुष्का वाईकर यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनला प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्राची वैद्यकिय अभ्यासक्रमानुसार पडताळणी करण्यासाठी व त्यानुसार दखल पात्र गुन्हा होतो किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय मिळण्याबाबत अधिष्ठाता, छत्रपती प्रमीला राजे शासकिय रुग्णालय यांना अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यानुसार चौकशी सुरु आहे.

तसेच या प्रकरणी महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यानुषंगाने महाराष्ट्र वैद्यकिय नियम १९६७ मधील नियम ६२ ते ७५ नुसार कार्यवाही सुरु आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(४७) * १०२६९५ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे (एस.आर.ए.) उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शिरीष यादव यांना लाच स्वीकारताना लाचलुचपत विभागाने अटक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही पुणे महानगरपालिकेच्या भूसंपादन विभागाचे उपायुक्त असताना बनावट टी.डी.आर. गैरव्यवहार प्रकरणी श्री.यादव यांना शासनाने केलेल्या कारवाईमध्ये निलंबित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.यादव यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये कार्यरत असताना मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार करुन अनेक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.शिरीष यादव हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये कार्यरत असताना त्यांनी मान्यता दिलेल्या सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांची फेरतपासणी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सर्व प्रकरणांची फेरतपासणी करण्यात आली आहे काय, तसेच वारंवार केलेल्या गैरव्यवहारामुळे निलंबित झालेल्या संबंधितांना शासन सेवेतून बडतर्फ करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, पुणे यांचेकडून दि.०१.१०.२०१५ रोजी अशी कारवाई झाल्याचा अहवाल आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना मान्यता देणे ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ह्यांच्या कार्यकक्षेतील आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयाच्या मंजुर नियमावली नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना मान्यता देण्याचे अधिकार उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नसून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.
त्यामुळे प्रकरणांची फेर तपासणी करण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही. सदर गुन्हयांबाबत विशेष न्यायालय, पुणे यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सदरचे खटले न्यायप्रविष्ठ आहेत,
असा ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे परिक्षेत्र यांचा अहवाल आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील श्रीक्षेत्र दारुकावणे औंढा नागनाथ तिर्थक्षेत्राचा विकास निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४८) * ९६७९७ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी ८ वे ज्योतिर्लिंग असलेले श्रीक्षेत्र दारुकावणे औंढा नागनाथ तिर्थक्षेत्राचा विकास निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाने औंढा नागनाथ संस्थानाच्या विकासासाठी रुपये १०० कोटींचा विकास आराखडा शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विकास आराखड्याला मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) जिल्हा प्रशासनाने औढा नागनाथ संस्थानच्या विकासासाठी २५ कोटीचा विकास आराखडा शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला होता.

तथापि, सदर प्रस्तावासंदर्भात नियोजन विभाग, दिनांक ०४.०६.२०१५ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांना निदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव महानगरपालिकेतील वाघुर पाणीपुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४९) * १०१५८० श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महानगरपालिकेतील वाघुर पाणीपुरवठा योजनेत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत जळगांव शहर पोलीस ठाणे येथे दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्याचे स्वरुप काय आहे व या प्रकरणी किती रकमेचा गैरव्यवहार झाला आहे,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जळगांव शहर येथे दि.२८.०७.२०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदरचा गुन्हा हा आर्थिक स्वरुपाचा असुन, प्रकरण तपासाधीन आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जळगांव शहर भाग-५ गु.र.नं. ६९/२०१२ भा.दं.वि. कलम ४०३, ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ सह लाच लुचपत प्रतिबंधक कायदा कलम १३(१)(क), १३(१)(ड), १३(२) नुसार दि.२८/०७/२०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास सुरु असुन आता पावेतो ८४ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मे.मोरदानी रियॅल्टी या विकासकाने बांद्रा येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत केलेला गैरव्यवहार

**(५०) * ९५९०९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील खार, बांद्रा येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम मे. मोरदानी रियॅल्टी या विकासकामार्फत सुरु असून उक्त विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नियमाप्रमाणे प्रकल्पाच्या बदल्यात २३० सदनिका, गाळे, संक्रमण शिबीर बांधून देणे बंधनकारक असूनही एकही सदनिका शासनास दिली नाही व यात रुपये १२०० कोटींचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी उपरोक्त प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्याची मागणी मा.गृहनिर्माण मंत्री, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे दिनांक १ व ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय. हे खरे आहे.

नगर विकास विभागाच्या दि.३१.१०.२००८ च्या तरतुदीनुसार विनियम ३३(१४) खालील एकत्रिकरण झालेल्या ५ योजना विचारात घेऊन विकासकाने जोगेश्वरी येथील भूखंडावर वि.नि.नि.३३(१४) डी अंतर्गत २२४ पी.टी.सी. सदनिका आणि सुविधासाठी ६ पी.टी.सी. सदनिका अशा एकूण २३० पी.टी.सी. सदनिका बांधणे अपेक्षित होते. परंतु आज पर्यंत विकासक मे. मोरदानी यांनी पी.टी.सी. सदनिका बांधून न दिल्यामुळे विकासकावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) व (३) LOI व IOA मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार PTC सुपूर्द न केल्यामुळे विकासक व वास्तुविशारद यांच्यावर दि.१८.०७.२०१७ रोजी क्र. ८१/१७ अन्वये MRTP अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने गुन्हा दाखल केला आहे. तसेच शासनाने दि.०५.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्देशानुसार विकासक मे.मोरदानी यांच्यावर खार पोलीस स्टेशन येथे दि.२०.११.२०१७ रोजी क्र.४५५/१७ आय.पी.सी. कलम ४२०, ३४ अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, पोलीस खात्यामार्फत चौकशी चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी महानगरपालिकेने घरपट्टी रक्कम ११ पटीने वाढविल्याबाबत

**(५१) * १०२२२४ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेने शासनाचे नियम डावलून १७ वर्षानंतर मालमत्तेचे पुनर्मूल्यांकन करुन घरपट्टीची रक्कम ११ पटीने वाढवली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरपट्टी वाढीला नागरिकांनी विरोध केला असून उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला तसेच दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास महानगरपालिका कार्यालयासमोर उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दरवाढ रद्द करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) परभणी शहरातील मालमत्तांची कर आकारणी सन १९९९-२००० मध्ये करण्यात आली होती. आर्थिक सुधारणांची बाब म्हणून आता परभणी महानगरपालिकेतंर्गत मालमत्तेचे पुर्नमुल्यांकन करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

(२) दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. तसेच दिनांक २४/८/२०१७ रोजी लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते.

(३) • परभणी शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करून, तसेच मोजमापे व इमारतींचा वापर याबाबतची सर्व माहिती संकलित करण्यात आली आहे.

• त्यानंतर करयोग्य मुल्य निश्चित करून मालमत्ता धारकांना कर आकरणीच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

• याबाबत उपस्थित झालेल्या आक्षेपांची सुनावणी घेवून व संबंधितांना योग्य संधी देवून मालमत्ता करामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही परभणी शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथील पोलीस ठाण्याच्या नविन प्रशासकीय इमारतीचे व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचे बांधकाम करण्याबाबत

**(५२) * ९५२१६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे पोलीस ठाण्याच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठीचे प्रस्ताव अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी तयार करून निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी प्रधान सचिव, गृह विभाग व पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदेवाही येथे पोलीस ठाण्याच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम व कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठीचे प्रस्ताव मंजूरीविना प्रधान सचिव, गृह विभाग व पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंदेवाही येथे पोलीस ठाण्याची नविन प्रशासकीय इमारत व कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाचे बांधकाम करण्याबाबत अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळातर्फे पोलीस ठाणे सिंदेवाही येथील पोलीस ठाण्याची नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम व कर्मचारी निवासस्थानाचा बांधकाम प्रकल्प नियोजन स्तरावर असून सदर बांधकामाकरीता प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथे राष्ट्रीय महामार्गावर बांधण्यात आलेल्या रस्त्याचे व माणकोली पुलाचे बांधकाम करणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(५३) * १०२१८० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे राष्ट्रीय महामार्गावर बांधण्यात आलेला रस्ता व माणकोली पूल अतिशय खराब झाल्याने ही कामे केलेल्या कंपनीची चौकशी करुन कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार संबधित दोषी कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तपासणी सुरु असून चौकशीअंती पुढील कार्यावाही करण्यात येईल.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील लोटस आणि आय.एन.एस. त्राता जवळील जुन्या जेट्टींच्या दुरुस्तीबाबत

**(५४) * ९५१३० श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील लोटस आणि आय.एन.एस. त्राता जवळील जुन्या जेट्टी सद्यस्थितीत मोडकळीस आल्या असून त्यामुळे स्थानिक मच्छीमार बांधवांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याने सदर जेट्टींच्या दुरुस्तीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मच्छीमार बांधव हे सातत्याने शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुषंगाने सदरहू जुन्या जेट्टींच्या दुरुस्तीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) दिनांक २७ मार्च २०१७ रोजी स्थानिक लोक प्रतिनिधींनी वरळी येथे दिलेल्या भेटीच्या वेळी स्थानिक मच्छिमारांसाठी जाळी विनण्यासाठी शेड व उघडा निवारा बांधणे, वरळी येथील खडक फोडणे व गाळ काढणे, स्लोपिंग रॅम व चौथरा उभारणी करणे, स्वच्छतागृहाचे बांधकाम इत्यादी कामे धडक कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करण्याच्या सुचना स्थानिक मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे वरळी कोळीवाडा नाखवा मत्स्यव्यवसाय सहकारी सोसायटी लि. यांनी वरळी येथे मुलभूत सविधा पुरविण्याबाबत दिनांक ८.४.२०१७ रोजीच्या पत्राद्वारे विभागास कळविले आहे.

(२) व (३) वरळी येथील मच्छिमारांसाठी सॉलिड जेटी, उघडा निवारा, मार्गदर्शक खांब, बोटयार्ड, विद्युत व्यवस्था तसेच पाच मासे सुखविण्याचे चौथरे ही कामे नाबार्ड टप्पा १६ अंतर्गत मंजूर करण्यात आली असुन मार्च, २०१६ अखेर या कामावर रु. २२२.०४ लक्ष इतका खर्च झालेला आहे. त्याचप्रमाणे वरळी येथे जेटी बांधकाम आणि मासे सुखविण्याचा चौथरा उभारणी ही कामे राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आली असून मार्च, २०१६ अखेर या कामांवर रु. २००.२७ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

-----------------

## मुंबईमध्ये गृहनिर्माण मंडळाच्या माध्यमातून बांधलेल्या सार्वजनिक शौचालयांची झालेली दुरवस्था

**(५५) * १०३४७६ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गृहनिर्माण मंडळाच्या माध्यमातून आमदार व खासदारांच्या निधीतून बांधलेल्या सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम शासन निर्णयातील निकष डावलून करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शौचालयांची दुरवस्था झाली असून म्हाडाच्या ७८ टक्के शौचालयांमध्ये पाणी उपलब्ध नसणे, ६२ टक्के शौचालयांमध्ये वीज उपलब्ध नसणे त्यामुळे पसरलेली अस्वच्छता व वापराविना पडून असलेल्या या शौचालयांमध्ये गर्दुल्ले आणि समाजकंटकांचा वावर असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ हे कार्यान्वयिन यंत्रणा म्हणून सदरील कामे करत असून, आमदार व खासदारांच्या निधीतून सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम शासन निर्णयातील निकषा प्रमाणेच करण्यात येते.
(२) व (३) आमदार व खासदारांच्या निधीतून सार्वजनिक शौचालयांचे करण्यात आलेले बांधकाम हे त्या लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या संस्थाना जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने हस्तांतरीत करण्यात येते. या संस्थांनी या शौचालयांची देखभाल व  दुरूस्ती करणे हे करारनाम्यात नमूद असते.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडे शौचालयाच्या दुरूस्ती व देखभाली करीता कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध नसतो.

तथापि, विधानसभेत दिलेल्या आश्वासना नंतर सदर बाबींचा शौचालयाच्या कामात अंतर्भाव करण्यात येऊन आता पाण्यासाठी पाईपलाईन टाकणे तसेच वीजेकरीता वायरिंग काम करणे या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे, व त्याप्रमाणे कामे करण्यात येत आहेत.

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत “मुंबई शहर” हागणदारीमुक्त करण्याच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा. मुख्य सचिवांनी खालील निर्देश दिले आहेत,

अ) मुंबई शहरातील म्हाडा च्या ताब्यात असलेली व वापरण्याजोगी ७७,००० शौचालये देखभाल व दुरूस्तीसाठी कायमस्वरूपी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावीत.

ब) बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपरोक्त ७७,००० शौचालये तातडीने म्हाडाकडून हस्तांतरित करून घ्यावीत.

क) बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपरोक्त ७७,००० शौचालयांपैकी आवश्यक त्या शौचालयांची दुरूस्ती करावी.

ड) मुंबई शहरातील म्हाडाच्या ताब्यात असलेली परंतु सुस्थितीत नसलेली ९,४५० शौचालयांची म्हाडामार्फत तातडीने दुरूस्ती करण्यात यावी. त्यानंतरही ९,४५० शौचालये बृहन्मुंबई महानगरपालिकेने हस्तांतरित करून घ्यावीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेतील गैरव्यवहाराबाबत

**(५६) * ९९५३८ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील दक्षिण भागातील तीन क्षेत्रीय कार्यालयांतर्गत जमा होणारा कचरा कात्रज ते उरळी देवाची दरम्यान वाहतूक करण्यासाठी ५० कोटी रुपयांची निविदा काढण्यास स्थायी समितीने एक मताने मंजूरी दिली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात सांडपाणी वाहिन्यांमधील गाळ न काढताच कोट्यवधी रुपयांची बिले अनियमितपणे अदा केल्याचेही माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाळ न काढताच कागदोपत्री कामे दाखवून कोट्यवधी रुपयांची बिले घेतली जात असल्याचे महानगरपालिकेच्या महत्वाच्या विभागांतर्गत कर्मचाऱ्याने निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थायी समितीने दिलेल्या मंजुरीमुळे कचऱ्याची वाहतूक करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या दरामध्ये १५९ रुपये प्रती टन वरून ४९५ रुपये प्रती टन या प्रमाणात दरवाढ (तिप्पट) होणार असून या दरामध्ये प्रतीवर्षी ८ टक्के दरवाढ प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कचरा वाहतूक करण्याच्या निविदा मंजूर करताना महानगरपालिका प्रशासनातर्फे कोणते निकष लावण्यात आले आहेत,

(६) असल्यास, त्यानुसार उपरोक्त प्रमाणे मंजूर केलेली कचरा वाहतूकीसाठीची निविदा रद्द करुन या निविदेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित व्यक्तिंवर कोणती कारवाई केली तसेच सांडपाणी वाहिन्यांमधील गाळ काढण्याच्या कामांमधील बेसुमार लूट थांबविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत दि.९.९.२०१७ रोजी दै.सकाळ या वृत्तपत्रात बातमी आलेली होती हे खरे आहे.

(४) कचऱ्याची वाहतूक करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या दरामध्ये रू.१५९ प्रती मे.टन वरून रू.४९५ प्रती मे.टन या प्रमाणात प्रतिवर्षी ८ % इतकी दरवाढ होणार आहे ही वस्तुस्थिती आहे.

(५) * या कामाकरीता एकूण २ कंपन्यांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर दोन्ही कंपन्या पात्र ठरल्या होत्या. त्यापैकी न्यूनतम दर असलेल्या मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. मुंबई या कंपनीच्या निविदेस मान्यता देण्यात आलेली आहे.

* सदर निविदा मंजूर करताना खालील निकष बंधनकारक केले होते :-

- निविदाधारकाची स्वत:च्या मालकीची कंपनी, नोंदणीकृत पार्टनरशिप असणारी फर्म, लिमिटेड लाएबिलीटी पार्टनरशिप कंपनी असणे आवश्यक आहे.
- कॉन्साटीयम मान्य केले जाणार नाही.
- मागील सलग ३ वर्षामधील वार्षिक उलाढाल किमान रू.२५ कोटी आवश्यक व एकूण मालमत्ता मागील आर्थिक वर्षात किमान १५ कोटी इतकी असावी.
- निविदाधारकास सलग ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्य.

(६) या प्रकरणी सविस्तर चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई मेट्रो वन प्रा.लि.ने भाड्यापोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कोट्यवधी रुपये थकविल्याबाबत

**(५७) * ९५५४० श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्सोवा ते अंधरी आणि घाटकोपर हा मेट्रो वन प्रकल्प उभारताना गृह विभागाची २४ हेक्टर जमीन कास्टींग यार्डसाठी वापरणाऱ्या रिलायन्सच्या मुंबई मेट्रो वन प्रा.लि.ने भाडयापोटी द्यावयाचे रुपये ३१ कोटी ६८ लाख थकविले असून एमएमआरडीएशी केलेल्या करारानुसार संबंधित जमिनीवर होमगार्ड प्रशिक्षण केंद्र व प्रशासकीय इमारत या कंपनीने बांधून दिली नसल्याची बाब दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होमगार्डच्या मालकीची २४ हेक्टर जमीन कास्टींग यार्ड म्हणून रिलायन्सच्या मुंबई मेट्रो वन प्रा.लि.ने वापरुन केलेल्या कराराला चारवेळा मुदतवाढ देऊनही झालेल्या लेखी कराराची अंमलबजावणी न केल्यामुळे एमएमआरडीएने मुंबई मेट्रो वन प्रा.लि.ला भाड्याची थकविलेली रक्कम रुपये ३१ कोटी ३८ लाख देण्याची लेखी विनंती वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करारातील इतर अटींचे पालन मुंबई मेट्रो वन ने अद्यापी न केल्यामुळे करारातील अटींनुसार त्यांचेविरुध्द एमएमआरडीएने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) भाडयाच्या रक्कमेच्या वसुलीबाबत कायदेशीर सल्ला घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

मुंबई मेट्रो वन प्रा.लि. कंपनीही सदर कामास प्रतिसाद देत नसल्यामुळे सदरच्या वर्सोवा होमगार्ड यांच्या जमिनीवर प्राधिकरणामार्फत प्रशिक्षण केंद्र व प्रशासकीय इमारत यांचे बांधकाम करण्याचे प्रस्ताविले आहे.

याकामी वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक, इमारत बांधणे, नकाशे तयार करणे व त्यास मान्यता घेणे तसेच सदर कामासाठी येणाऱ्या खर्चात मंजुरी प्राधिकरणामार्फत घेवून होमगार्डच्या जमिनीवर इमारतींचे बांधकाम करण्याकामी उप संचालक नागरी संरक्षण संचालनालय, होमगार्ड यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ०६/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

-----------------

## ओशिवरा (मुंबई) येथील भूखंडावर राघवेंद्र सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत राबविण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(५८) * १०१४७६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओशिवरा (मुंबई) येथील सिटी एस क्र. ३९७/१ ते १२, ३९८,३९८/१, ४०० पै, ४०६, ४०७ पै, ४०८ पै या भूखंडावर राघवेंद्र सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत राबविण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या वेळी मे.सहयोग होम्सच्या विकासकाने बनावट कागदपत्रे सादर करून प्रकल्प मंजूर करून शासनाचे सुमारे रुपये ४०० कोटींच्या महसूलाचे नुकसान केल्यासंदर्भात श्री.इफ़तेखार ए.शहा माहिती अधिकार कार्यकर्ता व सामाजिक कार्यकर्ता यांनी मा.गृहनिर्माण मंत्री, मा.महसूल मंत्री आदिंकडे दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास सविस्तर निवेदन सादर करून या प्रकरणी सखोल चौकशी करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विकासकाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) प्रश्नांकित भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या परिशिष्ट-२ संदर्भात चौकशी होऊन कारवाई होण्याबाबतची श्री.इत्तेखार शाह यांची प्रश्नात नमूद निवेदने मा.गृहनिर्माण मंत्री व मा.महसूल मंत्री यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाहीत. तथापि श्री.अरिफ

एम.शेख यांनी अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांचेकडे राघवेंद्र सह.गृह.संस्थाच्या परिशिष्ट-२ मधील बोगस झोपडीधारकांविरुध्द तक्रार दाखल केली आहे. अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांच्या कार्यालयाने दि. ३१.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर संस्थेच्या अविश्वसनीय पुरावे सादर करणाऱ्या झोपडीधारकांविरुध्द पुढील कार्यवाही बाबतचे आदेश व मार्गदर्शन मिळणेबाबत उच्च स्तरीय समितीकडे सक्षम प्राधिकारी यांनी विनंती अर्ज दाखल केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोकुळनगर (ठाणे) येथे सदनिका खरेदी व्यवहारात झालेली फसवणूक

**(५९) * १०२२४४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती शितल मळेकर, रा.गिरगाव, मुंबई यांची प्लॅट क्र. ११/बी, सतगुरु अपार्टमेंट, गोकुळनगर ठाणे (पश्चिम) या जागेच्या खरेदी व्यवहारात श्री.सुनिल पळसकर (अभियंता, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका) या जागा मालकाने रुपये ४० लाखांची फसवणूक केल्याची घटना माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी श्रीमती शितल मळेकर यांनी राबोडी पोलीस स्टेशन (जि.ठाणे) येथे तक्रार दाखल केली परंतु त्यानुषंगाने या प्रकरणी एफआयआरही दाखल करून घेण्यास स्थानिक पोलीसांनी १ वर्षाचा विलंब लावला, उक्त प्रकरणी पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्याकडे सुध्दा तक्रार अर्ज सादर केला असुनही फसवणुकीने घेतलेली रक्कम श्रीमती शितल मळेकर यांना परत मिळवून देण्याबाबत स्थानिक पोलीसांनी अदयाप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पत्रान्वये पोलीस आयुक्त, ठाणे यांना कारवाई करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) श्रीमती मळेकर यांनी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालयात तक्रार अर्ज दिलेला आहे. तथापि, सदरहू तक्रार ही त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित नाही.

या प्रकरणी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये पोलीस आयुक्त ठाणे यांना कारवाई करण्याबाबत पत्र दिल्याची बाब खरी आहे.

सदर प्रकरणी चौकशीअंती फिर्यादी श्रीमती मळेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राबोडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १४३/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ अन्वये एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधिन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील सहकारी संस्थांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(६०) * १०१५८१ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावीर अर्बन को.ऑप.सोसायटी लि. व जळगांव जिल्हा सहकारी स्टार्च उत्पादक संस्था या दोन संस्थांमध्ये तसेच दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., च्या इनलॅन्ड बिल पर्चेस (आर.बी.पी.) मध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत दिनांक २९ ऑक्टोबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पेठ पोलीस ठाणे, जळगांव येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्यांमधील अपहाराची रक्कम किती आहे,

(३) असल्यास, सदर गुन्ह्यांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे नोंद असलेल्या गु.र.नं. २७१/२०१२ भा.दं.वि.क. ४०३, ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ सह लाच लुचपत प्रतिबंधक कायदा कलम १३(१)(क), १३(२) या गुन्ह्यात महावीर पतसंस्थेला दिलेले कर्ज रुपये ८.०० कोटी, नगरपालिका, जळगांव यांना दिलेले कर्ज रुपये ५९.२६ कोटी व स्टार्च फॅक्टरी मालदाभाडी ता.जामनेर यांना दिलेले कर्ज रुपये ६०.५९ कोटी व त्यावरील व्याज असे एकूण रुपये १२७.८५ कोटी रुपयांचा अपहार केला असल्याची तक्रार आहे.

तसेच, इतरही बील पर्चेस संदर्भात गु.र.नं.२६९/२०१२ भा.दं.वि.क. ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १३(१) (ड) सह १३(२) या गुन्ह्यात

१) खान्देश बिल्डर्स प्रा.लि. रुपये २५३ कोटी ८० लाख ७५ हजार,
२) कृषी धन कॅटल्स फिडस् प्रा.लि. रुपये १७७ कोटी १८ लाख,
३) ई.पी.सी. हौसिंग प्रा.लि. रुपये ३४ कोटी ७५ लाख,
४) जैन इरिगेशन सिस्टीम प्रा.लि. रुपये ११ कोटी ९० लाख असे एकुण रुपये ४७७ कोटी ८० लाख ७५ हजार च्या अपहाराची तक्रार आहे.

सदर दोन्ही गुन्ह्यांची चौकशी सुरु असून, दोन्ही गुन्ह्यात आतापावेतो अनुक्रमे ८२ व ३९ साक्षिदारांचे जबाब नोंदविण्यात आलेले असून, सदर गुन्हे तपासावर आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## परभणी शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६१) * १०२६७९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेने योग्य नियोजन न केल्याने शहरातील नागरिकांना १० दिवसांनी एकदा पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील लोकसंख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली असतांनाही ३० वर्षे जूनी पाणी पुरवठा योजना कार्यरत असल्यामुळे व अवैध नळ जोडणीमुळे शहरातील नागरीकांना नियमित पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • परभणी शहराची सध्याची पाणी पुरवठा योजना ३५ वर्षापूर्वीची आहे. शहराची वाढलेली लोकसंख्या विचारात घेता, अस्तित्वातील जलकुंभाची साठवण क्षमता व जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता कमी पडत असल्यामुळे तसेच शहरात अनधिकृत नळजोडण्या आढळून येत असल्यामुळे शहरात १० दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे, हे खरे आहे.
(३) व (४) • परभणी शहरातील पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्यासाठी या शहरास केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अंतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती.

• त्यामध्ये ३ जलकुंभ व वितरण व्यवस्थेचे काम समाविष्ट आहे. सदर योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेस शासनाकडून अनुज्ञेय संपूर्ण अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

• त्याशिवाय महानगरपालिकेच्या विनंतीनुसार रुपये २० कोटी इतके सुलभ कर्ज उभारण्यास देखील मंजुरी देण्यात आली आहे.

• सदर प्रकल्पाबाबत सतत पाठपुरावा करुन हा प्रकल्प मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

• याशिवाय शहराची वाढीव लोकसंख्या विचारात घेऊन केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत रु. १०३.३८ कोटींची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.

• या योजनेत ६ जलकुंभ, जलशुध्दीकरण केंद्र आणि वाढीव वितरण व्यवस्थेचे काम समाविष्ट आहे. या कामाचे कार्यादेश दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी देण्यात आले आहेत.

• याशिवाय महानगरपालिकेमार्फत अनधिकृत नळ जोडण्याचा शोध घेण्याची मोहिम सातत्याने राबविण्यात येत आहे.

-----------------

## मॉडर्न मिलमधील गिरणी कामगारांच्या निवासस्थानांसाठी राखीव असलेला भूखंड कामगारांना मिळवून देण्याबाबत

**(६२) * ९५०२३ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॉडर्न मिल कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेने (नियोजित) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मॉनीटरिंग समिती समोर मागील अनेक वर्षे लढा दिला असून सदर समितीने दिनांक २३ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या आदेशानुसार मॉडर्न मिलतर्फे ए-२ हा भूखंड कामगारांच्या निवासस्थानांसाठी राखीव ठेवण्यात आला असूनही माहे नोव्हेंबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत सदरहू भूखंड कामगारांना देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार बी.आय.एफ.आर ने पारित केलेल्या आदेशानुसार सदरहू मिलमध्ये गिरणी कामगारांच्या निवासस्थानांसाठी राखीव असलेला भूखंड तातडीने कामगारांना मिळवून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) यांसदर्भातील बाब ही बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ५८(९)(a) च्या तरतूदीखालील निवृत्त उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचे अध्यक्षतेखाली गठीत असलेल्या सनियंत्रण समितीच्या कार्यकक्षेतील आहे. सदर सनियंत्रण समितीचा निर्णय हा अंतिम

असून सर्व पक्षकारांवर बंधनकारक आहे. यासंदर्भात राष्ट्रीय मिल मजदूर संघ व मॉडर्न मिल कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या अर्जावर विशेष सुनावणी दिनांक ११.१.२०१८ रोजी सनियंत्रण समितीसमोर नियोजित आहे. सनियंत्रण समितीकडून अंतिम निर्णय संकल्पित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेंतर्गत औंध-बाणेर-बालेवाडी भागातील स्मार्ट ग्रीड प्रकल्पाबाबत

**(६३) * १०००६५ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत औंध-बाणेर-बालेवाडी भागातील २४ तास अखंड वीज पुरवठा करण्यासाठी प्रस्तावित स्मार्ट ग्रीडचा प्रकल्प बंद केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून बँक गॅरंटी देण्याबाबत कोणताही निर्णय न घेण्यात आल्यामुळे तब्बल रुपये ५८० कोटी खर्चाचा ग्रीड प्रकल्प स्मार्ट सिटीतून वगळण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मार्ट सिटीमध्ये स्मार्ट ग्रीड प्रकल्प घेण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

• पुणे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत औंध-बाणेर-बालेवाडी भागातील स्मार्ट ग्रीड प्रकल्प रद्द करण्यात आलेला नाही.

(२) (३) व (४) • सदर प्रकल्पाचे काम जायका या बाह्य सहायित वित्तिय संस्थेच्या सहाय्याने राबविण्याचे पुणे स्मार्ट सिटी कंपनीचे नियोजन आहे.

• जायका या वित्तिय संस्थेकडून अर्थसहाय्य होण्यासाठी आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवालाचा प्रस्ताव राज्य शासनाच्या कर्ज निरंतरता प्रमाणपत्रासह केंद्र शासनास सादर करणे अपेक्षित आहे.

• त्याअनुषंगाने सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाचे कर्ज निरंतरता प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय घेण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## बांद्रा-पश्चिम (मुंबई) येथील भूखंडावर 'ला-मोअर' टॉवर उभारताना स्टील्ट पार्किंगच्या भागात विकासकाने केलेले अनधिकृत बांधकाम

**(६४) * १०१४८२ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा (पश्चिम) १५ वा रस्ता येथील नगर भू.क्र.एफ/४६०, टीपीएस III या भूखंडावर 'ला-मोअर' टॉवर उभारताना स्टील्ट पार्किंगच्या भागात महानगरपालिकेच्या एच/पश्चिम वॉर्डातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने व संरक्षणामुळे विकासकाने बेकायदेशीररित्या १२, १३ व १४ असे ३ अतिरिक्त माळे व कार्यालये बांधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महानगरपालिकेचे सुमारे रुपये ७० कोटी वा त्याहून अधिक महसूलाचे नुकसान झाले असून याप्रकरणी चौकशी होऊन संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री, नगरविकास, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका (पश्चिम उपनगरे) आदिंकडे श्री.इफतेखार ए.शहा, सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वांद्रे (पश्चिम) येथील भू.क्र.एफ/४६०, टीपीएस III या भूखंडावरील "ला-मोअर" टॉवर या इमारतीच्या ११ मजले+१२ व्या मजल्यावरील काही भागास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदर इमारतीत विकासकामार्फत तळमजल्यावरील स्टील्ट पार्किंगच्या भागातील कार्यालय आणि १२ व्या मजल्यावरील उर्वरित बांधकाम तसेच १३ व १४ हे अतिरिक्त मजले असे अनधिकृत बांधकाम करण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे.
(२) अशा आशयाचे निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले होते हे खरे आहे.
(३) व (४) सदर इमारतीतील अनधिकृत बांधकामांविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे:-
• तळमजल्यावरील स्टील्ट पार्किंगमधील अनधिकृत बांधकामास दिनांक १५.०५.२०१२ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावून दिनांक १२.०९.२०१२ रोजी अंतिम आदेश देण्यात आले.
• सदर नोटीस आणि अंतिम आदेशाविरोधात विकासकाने मा. दिवाणी न्यायालयात दाखल केलेला दावा क्रमांक २१६५/२०१२ मा. न्यायालयाने दिनांक १७.०७.२०१४ रोजी निकाली काढला.
• तद्नंतर विकासकाने मा. उच्च न्यायालयात दिनांक २७.१०.२०१४ रोजी दाखल केलेल्या दाव्यात मा. न्यायालयाने विकासकास अंतरिम दिलासा (Ad-interim Relief) दिला असून, सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २८.०५.२०१८ रोजी आहे.
• १२ व्या मजल्यावरील उर्वरित बांधकाम तसेच १३ व १४ हे अतिरिक्त मजले या अनधिकृत बांधकामास दिनांक २६.०९.२०१२ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे.

• सदर नोटीशीविरोधात विकासकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रमांक ११८८/२०१३ अन्वये मा. दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून, सदर प्रकरणी मा.न्यायालयाने रोजी “जैसे थे” (status quo) असे आदेश दिले आहेत.

• सदर प्रकरण दिनांक ०५.०३.२०१८ रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.